म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ५९९५

# स्त्रीसंहारक बकासुर

अर्थात

# बालविवाह

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. नि. नं. ५९९५
ता.
ठाणें.

मराठी ग्रंथ संग्रहालय
८८८२
नोंद नं.
ठाणें.

मूळ लेखिका

**एलीनॉर राथबोन**

---

सं. ठाणें.

अनुवादिका

**"कु. अनुराधा"**

REFBK-0005439

कि. ६ आणे

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. नि. नं. ८८८६
ता. १५।१३८
ठाणें.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ८४७६
ठाणें.

# स्त्रीसंहारक बकासुर

अर्थात्

# बालविवाह

मूळ लेखिका

एलीनॉर राथबोन

अनुवादिका

कु. " अनुराधा "

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ५४३८

REFBK-0005439

१९३६

सर्व हक्क प्रकाशकांचे स्वाधीन

मुद्रक आणि प्रकाशक
किर्लोस्कर प्रेस, किर्लोस्करवाडी.
( जि. सातारा )

नोंद नं.

# स्त्रीसंहारक बकासुर
## अर्थात्
# बालविवाह

स्थल प्रत

## परिचय

या लेखमालेच्या रूपानें Miss Eleanor F. Rathbone यांच्या "Child Marriage: The Indian Minotaur" या पुस्तकाचें भाषांतर मी माझ्या मराठी वाचक-भगिनींस सादर करणार आहें. मिस् राथ्‌बोन या इंग्लंडमधील एक सुविख्यात विदुषी असून, स्त्रीविषयक हरएक चळवळींत धैर्यानें पुढाकार घेऊन प्रसंगीं संकटें व सरकारी रोष सोसणाऱ्या आदर्श महिलांपैकीं एक आहेत. हिंदी स्त्रियांच्या अवनत दशेविषयीं त्यांना फार सहानुभूति वाटते व त्यांच्या उन्नतीच्या कार्यास शक्य ती मदत करण्यास त्या सदैव तत्पर असतात. त्या स्वतः पार्लमेंटच्या सभासद आहेत, आणि हिंदी स्त्रियांच्या प्रश्नाकडे ब्रिटिश मुत्सद्यांचें लक्ष वेधण्याची त्या सतत खटपट करीत असतात. हिंदुस्थानांत बालविवाहाची भयंकर चाल रूढ असावी हें ब्रिटिश राजसत्तेस अत्यंत लांछनास्पद आहे असें त्यांस वाटतें, व प्रस्तुत

पुस्तक त्यांनीं मुख्यत्वेंकरून ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या डोळ्यांत अंजन घालण्यासाठींच लिहिलें आहे. आपल्या पुस्तकाच्या छोट्या प्रस्तावनेंत त्या म्हणतात–

"मला कांहीं हिंदुस्थानांतल्या साऱ्या परिस्थितीची सांगोपांग माहिती नाहीं. मीं हिंदुस्थानांत प्रवास करून जें पाहिलें अन् हिंदुस्थानविषयक ग्रंथांतून जें वाचलें त्यावरून हें पुस्तक मीं लिहिलें आहे. अशा पुस्तकावर जी ठराविक टीका होते तिची मला कल्पना आहे. त्या टीकेला माझं उत्तर येवढंच कीं, माझा स्वतःचा अधिकार लहान असला तरी माझ्या लिहिण्याला जे आधार मीं दाखविले आहेत, त्यांचा अधिकार निर्विवाद आहे. माझ्या पुस्तकाचं हस्तलिखित ज्या माझ्या मैत्रिणीनं तपासलं, तिनं माझ्या विधानांतला कडकपणा बराचसा नरम केला आहे, तरी अजूनसुद्धां माझं प्रतिपादन वाचकांना कदाचित् जहाल वाटेल. पण मी म्हणतें, ज्या कागदपत्रांतले उतारे मीं ठिकठिकाणीं दिले आहेत, ते समग्र वाचून ज्याच्या हृदयाची कालवाकालव होणार नाहीं असा सहृदय माणूस मला कुणीं दाखवावा. माझा मनःसंताप मी आज अशा जाहीर रीतीनं व्यक्त करीत आहें, याचं कारण येवढंच, कीं बालविवाहाच्या राक्षसी रूढीविरुद्ध लोकमत जागृत करण्याचे स्त्रीला शोभतीलसे सारे विनयशील उद्योग आज तीन वर्षं करून मी थकलें. आतां सारी शालीनता सोडून स्पष्ट शब्दांत लिहिल्याखेरीज मला गत्यंतर नाहीं..."

मिस् राथ्बोन यांच्या या उद्गारांवरून त्यांच्या कळकळीची साक्ष सहज पटण्यासारखी आहे. त्यांची ही कळकळ व त्यांनीं संकलित केलेली माहिती या दोन गुणांमुळेंच त्यांचें पुस्तक मला फार आवडलें, व मराठी वाचकांस त्याचा परिचय करून द्यावा असें मला वाटलें. म्हणून मिस् राथबोन यांस मीं भाषांतराची परवानगी विचारली. ती त्यांनीं आनंदानं दिली याबद्दल या ठिकाणीं मी त्यांचे जाहीर आभार मानतें.

प्रकरण १ लें

# प्रस्तावना

हिंदुस्थानांतील बालविवाहाच्या प्रश्नाचा विचार दोन प्रकारांनीं करतां येईल. ब्रिटिश राज्यकर्त्यांनीं आजपर्यंत हिंदी स्त्रियांच्या हातीं स्वसंरक्षणाचीं कायदेशीर साधनें अगदींच थोडीं दिलीं; तीच स्थिति नव्या राज्यघटनेंतहि कायम राहिली तर बालविवाहामुळें होणारा संहार कसा कायम राहील तें पाहाण्यासारखें आहे. आणि शिवाय बालविवाहाची रूढि नष्ट करायची असेल तर संघटणाचें कार्य कोणत्या दिशेनें केलें पाहिजे त्याचाहि विचार करायला हवा. या दोन्ही गोष्टी डोळ्यांपुढें ठेवूनच मी विवेचन करणार आहें

हिंदी स्त्रिया अनेक दुष्ट रूढींना व कायद्यांना बळी पडलेल्या आहेत. पडद्याच्या चालीमुळें त्यांना जन्माचा बंदिवास घडत आहे, अज्ञानांधकारांत त्या चांचपडत असून शिक्षणाचे मार्ग त्यांना खुले नाहींत, प्राचीन शास्त्र्यांनीं विवाहाच्या विषम कायद्यांनीं त्यांना गुलाम बनविलें आहे, वैधव्यदशा म्हणजे प्रति नरकवास वाटावा अशा रूढींच्या मगरमिठींत त्या सांपडल्या आहेत, आणि बालविवाहानें तर पुराणांतरीच्या बकासुराप्रमाणें त्यांचा संहार चालविला आहे. ब्रिटिश

लोकांना आपल्या साम्राज्याचा मोठा अभिमान वाटतो; पण नवीन राज्यघटनेनुसार अननुभवी नामदारांच्या हातीं ज्या हिंदुस्थानचा कारभार ते देणार त्या हिंदुस्थानांतल्या सतरा कोटी कन्यकांची अवस्था वर वर्णिल्याप्रमाणें आहे ! आहे म्हणजे ब्रिटिश राज्यकर्त्यांनीं राहूं दिली आहे म्हणूनच आहे ! ही मोठी भूषणास्पद गोष्ट आहे, नाहीं ?

कोणी म्हणेल, रूढीचा दोष राजापेक्षां प्रजेवरच ठेवला पाहिजे. लोक रूढीप्रमाणें वागतात म्हणून रूढि कायम राहाते. या म्हणण्यांत कांहींसा सत्यांश आहे; पण राजकर्त्यांवरच जबाबदाऱ्या दोन प्रकारच्या असतात. जे जोरजुलूम किंवा अन्यायाच्या गोष्टी राज्यकर्ते स्वतः करतात त्यांचें तर सर्वच पाप त्यांच्या शिरावर असतेंच; पण याशिवाय आनुषंगिक पाप म्हणून एक असतें. तेंहि न्यायतः त्यांच्याच माथ्यावर बसायचें असतें. समाजांतला एखादा अनाचार अगर दुःखभोग धडधडीत दिसत असतां व तो दूर करण्याचें सामर्थ्य अंगीं असून तें आपलें कर्तव्यहि होय हें माहीत असतां त्यांचें निर्मूलन करण्यांत अंगचुकारपणा करणें हें तें आनुषंगिक पाप होय. देशांतली रोगराई व अस्वच्छता, मृत्युसंख्येचें प्रमाण, शिक्षणाची दैना, विवाहासंबंधीं आणि वारसासंबंधींचे कायदे इत्यादि गोष्टींची जबाबदारी सरकारवर आणि जे मतदार आपला कारभार त्याकडे सोंपवितात त्यांवर आहे याबद्दल मतभेद असणें शक्य नाहीं. आणि समाजांतल्या ज्या घटकांना अज्ञानामुळें स्वतःच्या हक्कांची जाणीव नाहीं व ज्यांच्या हातीं आत्मसंरक्षणाचीं साधनें नाहींत त्यांच्या हिताहिताची जबाबदारी तर सरकारवर सर्वस्वीं आहे असें म्हणावयास हरकत नाहीं !

कोटयवधि हिंदी लोकांचे आम्ही "मायबाप" आहोंत व त्यांची उन्नति करण्यासाठीं आम्ही झटत आहोंत, असें ब्रिटिश राज्यकर्ते उठल्यासुटल्या सांगत असतात. पण वर सांगितलेली जबाबदारी "मायबापां"ना शोभेल अशा तऱ्हेनें त्यांनीं पार पाडली

आहे का ? पूर्वी सारीच राजसत्ता त्यांच्या हातीं होती, आणि आतां त्या सत्तेचा थोडा अंश त्यांनीं हिंदी लोकांना दिला आहे; पण वर उल्लेखिलेल्या जबाबदारीची जाणीव त्यांनीं पूर्वींहि ठेविली नाहीं आणि आतांहि ठेवलेली नाहीं. कायदा धाब्यावर बसवून लाखों मुग्ध बालिकांचीं लग्नें व्हावींत, त्यांना अकालीं मातृपद प्राप्त व्हावें, दुखणींबाणीं जडावींत आणि अखेर हालहाल सोशीत मृत्युमुखीं पडावें लागावें हें खुशाल उघड्या डोळ्यांनीं पाहण्यापलीकडे “ मायबाप ” ब्रिटिश सरकारनें काय केलें आहे ? ही दुःस्थिति दूर करण्याच्या मार्गांत अडचणी असतील. धर्मवेडेपणा, खुळ्या समजुती, आळस, दारिद्र्य इत्यादि दोष प्रजेच्या ठिकाणीं असले, आणि राज्यकर्ते परकी आणि भिन्नधर्मीय असले, कीं समाजसुधारणेच्या कार्यांत अनेक विघ्नें उपस्थित होतात हें मला मान्य आहे. पण मी विचारतें, हीं विघ्नें दूर करण्याचे कितीसे आणि कितपत निकराचे प्रयत्न ब्रिटिश सत्ताधाऱ्यांनीं केले आहेत ?

हिंदी स्त्रियांच्या प्रश्नाबद्दल ब्रिटिश अधिकाऱ्यांना मुळीं जिव्हाळाच कधीं वाटलेला नाहीं ! बड्या, छोट्या लाटसाहेबांच्या जागांवर अधिकार गाजवून पेन्शन घेतलेल्या इंग्रजांनीं हिंदी लोकांच्या परिस्थितीवर आणि प्रश्नांवर जीं पुस्तकें लिहिलीं आहेत त्यांतलीं पांचपन्नास घेऊन त्यांत “ स्त्रिया ” “ विवाह ” “ पडदा ” असलीं सदरें विषयसूचींत पहावीं म्हणजे माझ्या म्हणण्याची सत्यता पटेल. असल्या स्त्रीविषयक प्रश्नांचें विवेचन या पुस्तकांतून बहुधा मुळींच नसतें. एखाद्या पुस्तकांत दोनचार पॅरिग्राफ असलेच तर त्यांतला ठरलेला मजकूर हा, कीं आमचे मिशनरी लोक हिंदी स्त्रियांची मोठी उन्नति करून राहिले आहेत, किंवा सतीची आणि भ्रूणहत्येची चाल ब्रिटिशांनीं बंद केली ! जणूं आमच्या आजापणजांच्या वेळीं झालेल्या या बहाद्दरीनंतर आम्ही आणखी तें काय करायचें अशीच लिहिणारांची भावना !

हिंदी स्त्रियांच्या प्रश्नाबद्दल या लेखकांना आपल्या कारकीर्दीच्या वेळीं सारखी तळमळ लागली असती, ते प्रश्न सोडविण्या-

स्थळ प्रत

साठीं अहर्निश विचार करतांना त्यांच्या हृदयाची कालवाकालव झाली असती, आणि हिंदी स्त्रियांची दुःस्थिति म्हणजे ब्रिटिशांच्या न्यायबुद्धीला एक मोठा कलंक आहे अशी त्यांच्या अंतःकरणाला सतत टोंचणी लागली असती, तर त्यांनीं त्याबद्दल असें लिहिलें नसतें !

ब्रिटिश अधिकाऱ्यांमध्यें कांहीं असे होऊन गेले, कीं ज्यांनीं स्त्रियांच्या दुःस्थितीबद्दलची आपली सहानुभूति सडेतोडपणें बोलून दाखविली, ती दूर करण्यांत आपल्या हातच्या सत्तेचा शक्य तितका उपयोग केला, नवे कायदे पुढे मांडले अगर उचलून धरले, आणि हें सारें करतांना झीज आणि दूषण सोसावें लागलें तर त्याची पर्वा केली नाहीं. तसेंच हेंहि खरें, कीं हिंदी स्त्रियांचा कैवार घेणारा अधिकारी बडा असला म्हणजे आपल्याला त्याचें नांव माहित होतें; पण असे कित्येक छोटे अधिकारी होऊन गेले असतील, कीं त्यांनीं हिंदुस्थानच्या दूरदूरच्या कानाकोंपऱ्यांत आपल्या शक्त्यनुसार हिंदी स्त्रियांस किती परोपरीचें साहाय्य केलें तें आपल्याला माहित नाहीं ! पण या झाल्या अपवादाच्या आणि वैयक्तिक सौजन्याच्या गोष्टी. सर्वस्वीं पुरुषांच्या हातीं असलेल्या ब्रिटिश राज्यकारभाराचें सामान्य धोरण पाहिलें आणि हिंदुस्थानांत नोकरी करण्यासाठीं भरती होणाऱ्या नव्या अधिकाऱ्यांस जो उपदेश उघडपणें करण्यांत येतो तो लक्षांत घेतला तर "स्त्रियांच्या प्रश्नांकडे डोळेझांक करावी हें उत्तम, त्यांत अधिक लक्ष घातलें कीं सरकारला अप्रियता मात्र संपादन करावी लागेल" असा संकेतच राज्यकर्त्यांनीं ठरविलेला दिसतो !

माझ्या या विधानांत कोणाला अतिशयोक्ति वाटत असेल तर बालविवाहप्रतिबंधक कायद्यांचा जो उद्वेगजनक इतिहास मीं पुढें दिला आहे तो त्यानें लक्षपूर्वक वाचावा.

# गेल्या पाऊणशें वर्षांतील बालविवाहप्रतिबंधक कायद्यांचा इतिहास

बालविवाह व अकाली गर्भधारणा यांचें घातुक स्वरूप, आणि या बाबतींत हात घालण्याचा सरकारचा हक्क हिंदुस्थानच्या राज्यकर्त्यांनीं एक शतकापूर्वींच मान्य केला आहे. हिंदूंच्या व मुसलमानांच्या प्राचीन धर्मशास्त्रांत ग्रथित केलेले कायदे पाहिले तर, त्यांतहि विवाहबाह्य जबरीसंभोग करणाऱ्यास शासन करण्याची व्यवस्था केलेली आढळते. विवाहित स्त्रीपुरुषांच्या संबंधांतहि स्त्री पूर्ण वयाची आहे कीं नाहीं हें पाहिलें पाहिजे व ती वयांत आलेली नसेल तर तिचा संभोग गुन्हा समजला गेला पाहिजे ही कल्पना मात्र प्रथम अठराशें-शेचाळीसमध्यें इंडियन पीनल कोडाचा खर्डा तयार करण्यास बसलेल्या कायदेपंडितांनीं पुढें मांडली. पीनल कोड जेव्हां पुढें अठराशेंसाठ सालीं अमलांत आलें तेव्हां बायको दहा वर्षांच्या आंतली असतांना नवऱ्यानें तिचा उपभोग घेतला तर त्याला जास्तींत जास्त जन्मठेप काळ्या पाण्यापर्यंत शिक्षा द्यावी असें कलम घातलें गेलें.

या कायद्याचा अपुरेपणा लक्षांत यायला तीस वर्षें लागलीं ! स्त्री दहा वर्षांखालची असेल तर तिचा संभोग गुन्हा ! म्हणजे स्त्री दहा वर्षांची झाली कीं ती संभोगास पात्र ! आणि तिचा उपभोग घेणार पुरुष गुन्हेगार नव्हे तर अगदीं पुण्यपुरुष ! केवढी भयंकर विचारसरणी ही ! यामुळें कोंवळ्या वयांत संभोगास बळी पडून यातनांनीं जर्जर झालेल्या विवाहित स्त्रियांच्या आणि वेश्यांच्या संख्येला थोडाच आळा बसणार ? बंगाल प्रांतांत तर असल्या संभोगाच्या कांहींकांहीं मोठ्या हृदयविदारक हकीगती उघडकीस आल्या व संमतिवय दहाव्या वर्षाहून अधिक केलें पाहिजे ही गोष्ट उघड झाली. १८९१ सालीं बारा हें संमतिवय ठरलें ! संमतिवयाची मर्यादा दहाची बदलून बारा करावी हें बिल जेव्हां

सर अँड्र्यू स्कोबल यांनीं पुढें आणलें तेव्हां त्याविरुद्ध लोकांनीं पुष्कळ जोराची चळवळ केली. पण सर स्कोबलनीं चांगलाच नेट धरला. त्यांनीं स्पष्ट सांगितलें, कीं " प्रजेच्या एका मोठ्या वर्गाचें जीवित सुरक्षित व्हावें म्हणून योजना करण्याचें अगत्य जेव्हां स्पष्ट दिसतें तेव्हां प्रजेच्या पूर्वापार रूढींत ढवळाढवळ करण्याचा सरकारचा स्वयंसिद्ध हक्क आहे ! " आणि हिंदी लोकांच्या पुरातन धर्मसमजुतींचा व आचारांचा मान राखण्याचें राणीनें आपल्या जाहीरनाम्यांत वचन दिलें आहे अशी जेव्हां बिलाच्या विरोधकांनीं हाकाटी केली, तेव्हां त्या वेळचे व्हाइसरॉय लॉर्ड लॅन्सडाऊन यांनीं स्वतः सणसणीत उत्तर दिलें, कीं " राणीच्या जाहीरनाम्यांतल्या आश्वासनाला सुद्धां अपवाद आहे. ज्यायोगें वैयक्तिक जीविताला धोका पोंचेल आणि सामाजिक स्वास्थ्याचा व शांततेचा नायनाट होईल, आणि मानवी विवेकबुद्धि आणि न्यायनीति ज्यांचा केव्हांहि धिःकारच करील अशा रूढि जर धर्माच्या नांवाखालीं चालू असल्या तर धार्मिक भावनांपेक्षां नीतीच्या मूलतत्त्वाचाच गौरव केला पाहिजे. "

या उत्तरांत केवढा निश्चय आणि आत्मविश्वास भरलेला दिसतो ! पण दुर्दैवानें १८९१ चा संमतिवयाचा कायदा पास झाल्यानंतर त्याचा अंमल करण्याचें काम ज्याच्याकडे गेलें त्यांनीं हा निश्चय व करारीपणा दाखविला नाहीं. कायद्याचा अंमल तर राहोच, पण कायद्याचें स्वरूप आणि सरकारनें तो कोणत्या कारणासाठीं व कोणत्या हेतूनें केला याची माहिती सर्व प्रजेला करून देण्याची साधी कामगिरीसुद्धां घड केली नाहीं ! १९२८ सालीं म्हणजे १८९१ चा कायदा पास झाल्यानंतर सदतीस वर्षांनीं संमतिवयाच्या प्रश्नावर सरकारनें जी चवकशी कमिटी नेमली तिनें असें स्वच्छ लिहून ठेवलें आहे, कीं "विवाहित स्त्री अमुक एका वयाची झाली नसेल तर तिचा उपभोग घ्यावयास कायद्याची हरकत आहे ही गोष्टच देशांत कुणाच्याहि गांवीं नाहीं. न्यायाधीश, वकील,

आणि तुरळक सुशिक्षित लोक यांनाच संमतिवयाच्या कायद्याची काय माहिती असेल ती. सामान्य जनता पाहिली तर तिला या कायद्याच्या अस्तित्वाची दादसुद्धां नाहीं ! सरकारनें या कायद्याचें आणि त्याविरुद्ध वर्तन केल्यास होणाऱ्या शिक्षेचें ज्ञान लोकांना नीट करून दिलें असतें, तर लोकांकडून या कायद्याचा बोज खचित अधिक राहिला असता ! ”

१८९१ च्या कायद्याची सरकारनें अशी उपेक्षा केली याचीं तीन कारणें दिसतात. एक तर, कांहीं प्रांतांत या कायद्याविरुद्ध लोकमत फारच प्रतिकूल होतें, त्यामुळें कायद्याची सक्ति केल्यास लोक प्रक्षुब्ध होतील अशी सरकारला भीति वाटली असावी. दुसरें कारण असें, कीं अधिकाराच्या जागेवर अगर कायदेमंडळांत एकहि स्त्री नसल्यानें सारा पुरुषांचा कारभार, मग स्त्रियांच्या प्रश्नाकडे पाहतो कोण, असें झालें असावें. आणि तिसरें कारण असें, कीं कायद्याची अंमलबजावणी केली कीं सुपरिणामाऐवजीं भलतेच दुष्परिणाम व्हायचे अशी विसंगति त्याच्या घटनेंत राहिल्याचें लवकरच दिसून आलें असलें पाहिजे.

संमतिवयाच्या कायद्याचा अंमल नीट झाला नाहीं याच्या कारणांचें विवेचन करतांना १९२८ सालच्या चौकशीकमिटीनें आपल्या रिपोर्टांत म्हटलें आहे, कीं पहिली अडचण म्हणजे या कायद्याविरुद्ध होणारा गुन्हा अतिशय खाजगी स्वरूपाचा असणार; दुसरी गोष्ट अशी, कीं खटला भरला तरी गुन्ह्याला बळी पडलेल्या मुलीचें वय नक्की ठरविणें कठीण; कारण हिंदुस्थानांत अपत्यजन्माची पद्धतशीर नोंदणी होते कोठें ? असल्या खटल्यांत साक्षीदार सुशिक्षित व सुज्ञ पाहिजेत तेहि दुर्मिळ ! आणि सर्वांत मोठी अडचण ही, कीं संमतिवयाच्या पूर्वी पत्नीवर पतीनें बलात्कार केला तरी ती किंवा तिचे पालक उघडपणें कोर्टांत दावा करायला भिणार ! कारण, ‘ पति म्हणजे परम दैवत होय ’ ही कल्पना हिंदुस्थानांतल्या प्रत्येक मुलीच्या हृत्पटलावर इतकी पक्की

कोरलेली असते, कीं पतीविरुद्ध न्यायकोर्टांत पुरावा देण्याऐवजीं प्राणांतिक यातना सोसायला ती तयार होईल ! तिनें ही मानसिक गुलामगिरी तोडून साक्ष दिलीच तर समाज तिला फाडून खायला तयार आहेच ! बरें, स्त्रीचे आईबाप विचार करणार, कीं आपण जांवयाविरुद्ध खटला भरून जिंकला तरी उद्यां त्यानें आपल्या मुलीला टाकलें कीं झाला का तिच्या जन्माचा सत्यानाश ! त्यापेक्षां आळीमिळी गपचळी बरी ! "

या अडचणी मोठ्या जबरदस्त दिसतात हें तर खरेंच. पण म्हणून सरकारची चूक कांहीं त्यामुळें कमी ठरत नाहीं. कारण संमतिवयाचा कायदा यशस्वी करून दाखवायचा असेल तर त्याबाबत लोकांत मतप्रचार जोरानें केला पाहिजे व गुन्हे उघडकीस आणण्याच्या आणि शिक्षा ठोठावण्याबाबतींत शैथिल्य दाखवितां कामा नये, या गोष्टी कायदा पास करण्यापूर्वीच सहज कळण्यासारख्या होत्या. त्या कळूनसवरून कायदा पास केल्यावर त्याचा कळकळीनें पाठपुरावा आणि अंमल करणें सरकारचें उघड उघड कर्तव्य होतें. सरकारनें त्यांत चुकारपणा केला हें नाकारण्यांत अर्थ नाहीं. इतकेंच नव्हे, तर पुन्हा वेळ आली तेव्हां या चुकांचीच सरकारनें पुनरावृत्ति कशी केली तें मी पुढें दाखविणारच आहें. चूक घडली तर निदान तिच्यापासून धडा घ्यावा हा न्याय जगांतल्या कोणत्याहि राज्यकर्त्यांना लागू नसतोच कीं काय कोण जाणे !

असो. सारांश, १८९१ चा कायदा पास झाल्यावर तीस वर्षेंपर्यंत स्त्रियांच्या या अत्यंत जिव्हाळ्याच्या प्रश्नाचा लोकांना पुरा विसर पडला येवढें खरें. सगळेच जण खुशाल झोंपीं गेले. मग महायुद्धानें ही झोंप खाडकन् उतरविली. प्रजेच्या शरीरसंपत्तीची काळजी घेतली पाहिजे ही जाणीव महायुद्धानें उत्पन्न केली, आणि हिंदी लोकांच्या शारीरिक दौर्बल्याची कारणपरंपरा नीट पाहाण्याची लोकांना जरुरी वाटूं लागली. मॉंटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणांच्या

प्रत ९६

कालापासून हिंदी सुधारकांनीं संमतिवयाच्या प्रश्नाकडे वरिष्ठ कायदे-मंडळाचें सारखें लक्ष वेधण्यांत पुढाकार घेतला. संमतिवयाची मर्यादा वाढविणारें एक बिल १९२२ सालीं वरिष्ठ कायदेमंडळापुढें मांडण्यांत आलें, व तें प्रांतिक सरकारांकडे अभिप्रायासाठीं पाठविण्यांत आलें. त्यांपैकीं तिघांनीं प्रतिकूल, दोघांनीं गुळमुळीत, आणि तिघांनीं अनुकूल अभिप्राय दिला.

नंतर दोन वर्षांनीं सर हरिसिंग गौर यांनीं संमतिवय वाढ-विण्यासंबंधींचें बिल पुन्हा एकदां वरिष्ठ कायदेमंडळापुढें आणलें, व या प्रश्नाला चालना दिली. या वेळीं हें बिल " सिलेक्ट कमिटी- " कडे सोंपविण्यांत आलें. मूळ बिलांत संमतिवयाची मर्यादा चवदा घातली होती ती या कमिटीनें तेरावर आणली. कायदेमंडळानें ही दुरुस्ती अमान्य केली, आणि विवाहबाह्य संभोगाच्या बाबतींत तर संमतिवयाची मर्यादा सोळा वर्षांची असावी असें ठरविलें. पण सर-कारनें या गोष्टीस जोराचा विरोध केला, आणि बिल नापास झालें !

पण लोकमत आतां या बाबतींत बरेंच जागृत झालें होतें. त्यामुळें सरकारनें पुढच्याच वर्षीं आपण होऊन संमतिवयाचें बिल कायदेमंडळापुढें मांडून पासहि करून घेतलें. या कायद्याप्रमाणें पति-पत्नींच्या संबंधांत स्त्रीचें संमतिवय तेरा, व विवाहबाह्य संभोगांत चवदा ठरलें.

संमतिवयाची मर्यादा त्याहूनहि वाढवून घ्यायचा प्रयत्न सर हरिसिंग गौर यांनीं १९२७ सालीं केला. पण मध्यंतरीं या प्रश्नाचा खोल विचार करणाऱ्यांना असें पक्कें वाटूं लागलें होतें, कीं अपूर्ण वयांत स्त्रीचा संभोग घेतला जाणार नाहीं याविषयीं तजवीज करण्यापेक्षां बालवयांत स्त्रीचें अगर पुरुषाचें लग्नच होणार नाहीं असा कायद्यानें बंदोबस्त करावा हें उत्तम. म्हणून रावसाहेब हरि-विलास सारडा यांनीं बालविवाहप्रतिबंधक बिल पुढें आणलें, व जून १९२८ मध्यें सरकारनें या प्रश्नाची पूर्ण चवकशी करण्यासाठीं एक कमिटी नेमली.

स्थल प्रत

त्या वेळचे मध्यप्रांत सरकारचे गृहमंत्रि सर मोरोपंत जोशी हे या कमिटीचे अध्यक्ष होते, म्हणून या कमिटीचें " जोशी कमिटी " असें नांव पडलें. या कमिटींत एकच स्त्री होती, ती ब्रिटिश डॉक्टर होती. सहा सभासद हिंदु होते, व तीन मुसलमान होते. दोन सभासद पूर्वी न्यायाधिशाच्या अधिकारावर काम केलेले गृहस्थ होते व चार निष्णात वकील होते. म्हणजे सरकारनें वचन दिल्या-प्रमाणें खरोखरच मोठी वजनदार कमिटी नेमली गेली यांत संशय नाहीं. या कमिटीनें कामहि तत्परतेनें व कसून केलें. एक सबंध वर्ष-भर तिचा उद्योग चालला होता. तिनें सर्व हिंदुस्थानभर प्रवास केला, आठ हजार लोकांकडे आपली प्रश्नपत्रिका धाडून त्यांचीं मतें गोळा केलीं, आणि थोडचाथोडचा नव्हे, तर चारशें साक्षीदारांच्या साक्षी समक्ष घेतल्या. तिनें अखेर सादर केलेल्या आपल्या विस्तृत रिपो-र्टांत हिंदी जीवनांतील गलिच्छ व तिरस्करणीय अशा कित्येक गोष्टी चव्हाटचावर आणल्या खऱ्या, पण त्यावरून सिद्धान्त काढले व उपाय सुचविले तेहि बिनतोड आणि निर्भय होते. किंबहुना या कमिटीचा रिपोर्ट म्हणजे बालविवाहाच्या प्रश्नावरील एक अमोलिक ग्रंथच होय असें निःसंशय म्हणतां येईल.

बालविवाहाचा प्रचार व त्याचे घातुक परिणाम यांची सवि-स्तर छाननी करून ही कमिटी अखेर अभिप्राय देतांना म्हणते,

" स्त्रियांना अल्पवयांत मातृपद प्राप्त व्हावें ही समाजाचा भयंकर घात करणारी गोष्ट आहे. तीमुळें बालमृत्यूचें प्रमाण वाढतें, स्त्रिया अल्पायुषी होतात, त्या जगल्या तरी नाना प्रकारच्या व्याधींनीं त्यांचें आरोग्य ढांसळतें, आणि एकंदरींत सबंध राष्ट्राच्या शारीरिक बळाचा ऱ्हास होतो ! सरकारनें जी सतीची चाल काय-द्यानें बंद केली तिच्याहूनहि अल्पवयांतल्या मातृत्वाचे परिणाम खरें पाहतां अधिक घातक आहेत. एक तर असें, कीं सतीची चाल रूढ होती तेव्हांसुद्धां सगळ्याच स्त्रिया सती जात होत्या असें नव्हे, कांहीं थोडचा जात असत. चितेवर चढणाऱ्या विधवेच्या भयंकर

यातना पाहून पाहाणाऱ्याच्या अंतःकरणाचें पाणीपाणी होई, म्हणून त्या चालीच्या दुष्टपणाविरुद्ध माणसाचें मन चेतून उठे. पण कांहीं झालें तरी वैयक्तिक हालअपेष्टांचा तो प्रश्न होता. यातनांचें तें दिव्य ज्या त्या स्त्रीला आपल्यापुरतें सोसावयाचें असे. त्या दुःखाची परंपपरा पुढें कोणाच्या वांटयाला येत नसे. आणि आपल्या देहाचा होम करणाऱ्या स्त्रीला आदर्श पतिव्रता म्हणून देवतापद प्राप्त होई त्यामुळें तिचा तो दुःखभोग एका अर्थी सार्थकीं लागला असें तरी म्हणण्यास जागा असे. पण अकालीं मातृपदप्राप्तीची गोष्ट अशी नाहीं. या दुष्ट संकटाच्या कचाटयांत एक व्यक्तीच नव्हे तर सबंध समाज सांपडलेला आहे. लाखों हिंदु व मुसलमान स्त्रिया या संकटास बळी पडलेल्या आहेत व त्यामुळें राष्ट्राचा सबंध सांगाडा खिळखिळा होत आहे. अल्पवयांत मातृपद प्राप्त झालें, कीं स्त्रीला दीर्घायुष्य लाभणें शक्य नाहीं. योगायोगानें ती जगलीवांचली तरी तिसाव्या वर्षीच पाऊणशें वर्षांच्या म्हातारी-सारखी तिची अवस्था होते. त्या बिचारीचें जीवित म्हणजे जिवंत नरकवास! रूढीच्या कालिकेपुढें चिरून टाकलेला बळीच तो!... सतीची चाल बंद करण्याची आवश्यकता जर सरकारला पटली, तर आम्ही खचित असें म्हणतों, कीं न्यायनीतीच्या, दयाधर्माच्या, कोठल्याहि दृष्टीनें विचार केला तरी स्त्रियांस अल्पवयांत मातृपद देणाऱ्या बालविवाहाच्या या घातुक चालीचा कायद्यानें ताबडतोब प्रतिबंध करायलाच पाहिजे!"

हा उतारा वाचतांना आपल्या कल्पनाचक्षूंपुढें असें दृश्य दिसूं लागत नाहीं का, कीं या कमिटींतल्या न्यायाधिशांनीं, कायदे-पंडितांनीं व मुत्सद्यांनीं जेव्हां बालविवाहानें देशांत उत्पन्न केलेल्या दुर्दशेची प्रत्यक्ष डोळयांनीं पाहणी केली तेव्हां त्यांच्या चित्ताचा भयानें व सात्त्विक संतापानें मनस्वी क्षोभ झाला, आणि तो बोलून दाखविण्यास अन्वर्थक शब्द तरी कोठून आणावेत असें त्यांस होऊन गेलें? कमिटीनें जो पुरावा गोळा केला त्याचे थोडेथोडके नव्हे तर नऊ लठ्ठलठ्ठ ग्रंथ झाले, आणि इतकें असूनहि कमिटीच्या एका

सभासदानें वरिष्ठ कायदेमंडळांत भाषण करतांना असे उद्गार काढले, कीं "छापील रिपोर्टांत नमूद केलेल्या गोष्टींहूनहि प्रत्यक्ष परिस्थिति अधिक हृदयद्रावक आहे. सनातनी मतांच्या जुन्या लोकांना उगीच दुखविणें बरें वाटलें नाहीं म्हणून आम्हीं कित्येक गोष्टी रिपोर्टांतून गाळल्या आहेत !"

बालविवाहाच्या समर्थनार्थ जे मुद्दे पुढें करण्यांत येतात ते सगळे एकामागोमाग हातीं घेऊन जोशी कमिटीनें त्यांतील बालिशपणा आणि खोटेपणा चक्क उघड करून दाखविला. शिरगणतींतल्या माहितीची छाननी केल्यावर कमिटीस असें आढळून आलें, कीं हिंदुस्थानांतील शेंकडा बेचाळीस मुलींचीं लग्नें पंधराव्या वर्षांच्या आंत होतात. पुष्कळांचा असा समज आहे, कीं बालविवाहाची चाल फक्त हिंदुधर्मीयांतच आहे; पण मुसलमान लोकांतहि ही चाल किती प्रचलित आहे याचे जेव्हां धडधडीत आंकडे गोळा झाले तेव्हां ते पाहून कमिटींतील मुसलमान सभासदांस आश्चर्याचा धक्का बसल्यावांचून राहिला नाहीं. पंधराव्या वर्षाच्या आंत विवाहित होणाऱ्या मुलींचें प्रमाण हिंदूंमध्यें शेंकडा ४८ तर मुसलमानांत शेंकडा ३७ असल्याचें आढळून आलें. (पुढें १९३१ सालीं जी शिरगणति झाली तीवरून तर अल्पवयी विवाहित स्त्रियांची संख्या हिंदूंपेक्षां मुसलमानांत अधिक झालेली दिसली!) बालविवाहाचे पुरस्कर्ते पुष्कळदां असें प्रतिपादितात, कीं बालविवाह म्हणजे कांहीं बालसंभोग नव्हे. विलायतेंत जसा वाङ्निश्चय होतो तसाच आमच्यांतला हा बालविवाह होय. यावर कमिटीनें असें म्हटलें आहे, कीं "बालविवाह म्हणजे केवळ वाङ्निश्चय होय असें मुळींच मानतां येणार नाहीं. विलायतेंत वाङ्निश्चय झाल्यानंतर वधूच्या अगर वराच्या मनांत आलें तर विवाह रद्द करतां येतो. बालविवाहाचें तसें नाहीं. तो झाला कीं लोकमताच्या व कायद्याच्या दृष्टीनें वधूवर हीं आजन्म पतिपत्नीच्या नात्यानें बांधलीं जातात, आणि पुरुष मृत्यु पावला तर स्त्रीला वैधव्य प्राप्त होतें." विवाहानंतर

नि. ८०

बालवधूचें गर्भाधान ताबडतोब होत नसलें, तरी "तें लवकरच उरकण्याचा प्रचार असून पुरुषाशीं संयुक्त होण्यास शरीरशास्त्राच्या दृष्टीनें वधूच्या ठिकाणीं पात्रता आली आहे कीं नाहीं याचा विचार क्वचितच केला जातो." ऋतुप्राप्तीच्या पूर्वींच पत्नीचा संभोग पतीनें घेण्याची राजरोस वहिवाट नसली तरी "कोणाला कल्पनाहि होणार नाहीं इतक्या मोठ्या प्रमाणावर हा भयंकर प्रकार प्रत्यक्ष घडतो," असें हातीं आलेल्या पुराव्यावरून कमिटीनें म्हटलें आहे.

दिल्ली येथील लेडी हार्डिंज मेडिकल कॉलेजच्या प्रिन्सिपल डॉ. कॅम्पबेल या कमिटीस सादर केलेल्या आपल्या साक्षींत म्हणतात, "साडेबारापासून साडेसोळा वर्षांपर्यंतच्या किती मुलींचीं बाळंतपणें मीं केलीं त्याची गणति केली तर एक हजारावर सहज जाईल. असल्या अकालीं गर्भधारणेच्या व प्रसूतीच्या भयंकर परिणामांचें कितीहि वर्णन केलें तरी तें अपुरेंच ठरेल."

दार्जिलिंगच्या डॉ. ब्लेरनीं प्रसूतिवेदनांनीं मृत्यु पावलेल्या एका मुलीचें वय अकरा वर्षें दहा महिन्यांचें असलेलें आपण पाहिलें आहे असें सांगितलें, व बारा साडेबारा वर्षांच्या मुली आपल्याकडे प्रसूतीसाठीं आल्याचे व त्यांचे हाल झाल्याचे दाखले दिले. लखनौ येथील किनेर्ड मेमोरिअल हॉस्पिटलवरील मुख्य अधिकारी डॉ. डग्लस् यांनीं नमूद केलेलें एक उदाहरण तर अत्यंत उद्वेगजनक आहे. ते म्हणतात, "माझ्याकडे उपचारार्थ आलेल्या एका मुलीचें वय अवघें बारा वर्षांचें होतें. तिच्या बहिणीनें तिला नवऱ्याच्या घरांतून त्याच्या धमकावणीला भीक न घालतां काढून आणलें होतें. ती अल्पवयी मुलगी हॉस्पिटलमध्यें दाखल करून घेतांना मीं पाहिलें तों नवऱ्याच्या पाशवी कर्मानें तिच्या योनिमार्गाची चीरफाड उडाली होती, तिच्या योनिमुखांत तर किडे पडले होते, आणि तिला परमा झाल्याचीं चिन्हें स्पष्ट दिसत होतीं. पुढें मला कळलें, कीं तिच्या नवऱ्यानें आपल्या बायकोनें आपल्याजवळ नांदावें असा कोर्टांत दावा केला आणि जिंकला!"

पेशावर येथील मेडिकल मिशनच्या मिसेस लिलिअनस्टार म्हणतात, “काश्मीर प्रांतांत प्रसूतीसाठीं हॉस्पिटलमध्यें आणल्या जाणाऱ्या कितीतरी मुली अकराअकरा, बाराबारा वर्षांच्या असतात. अत्यंत कुशलतेच्या शस्त्रक्रियेखेरीज प्रसूतींत त्यांचे अगर त्यांच्या पोटीं जन्मणाऱ्या मुलांचे प्राण वांचविणें शक्य नसतें. ज्यांना हॉस्पिटलमध्यें येण्याची सोय नाहीं अशा कितीतरी अल्पवयी कोंवळ्या मुली प्रसूतींत मृत्युमुखांत पडत असल्या पाहिजेत !”

अशा प्रकारच्या आणखी कित्येक साक्षी जोशी कमिटीच्या रिपोर्टींत दाखल झाल्या आहेत !

बालविवाहाचें समर्थन करण्यासाठीं कित्येकदां असें सांगण्यांत येतें, कीं पाश्चात्य देशांपेक्षां आपल्या हिंदुस्थानांत मुलींना ऋतु फार लवकर प्राप्त होतो. परंतु या म्हणण्यांत फारच थोडा सत्यांश आहे. पाश्चात्य मुलीच्या ऋतुप्राप्तीच्या वेळच्या वयाची व हिंदी मुलींच्या त्या वयाची तुलना केली तर अवघ्या एका वर्षाचाच फरक असतो असें कमिटीस पुराव्यावरून आढळून आलें.

अखेर बालविवाहाची रूढि हलकें हलकें आपोआप नष्ट होत आहे या विधानाबद्दल कमिटीनें म्हटलें आहे, कीं “कांहीं जातींत ही सुधारणा होत असली तरी ती अत्यंत सावकाश होत आहे. शिवाय एका जातींत सुधारणा व्हावी तर दुसऱ्या जातींत उलट पीछेहाट व्हावी असा प्रकार घडत आहे. उच्चवर्णीय लोक बालविवाहाची रूढि टाकीत आहेत, पण कनिष्ठ जातींतले लोक या रूढीचा अधिकाधिक अवलंब करीत आहेत. असें केल्यानें आपण उच्चवर्णीय गणले जाऊं अशी वेडी समजूत त्यांनीं करून घेतलेली असावी !”

पण केवळ बालविवाहाच्या प्रचाराचे नुसते आंकडे पाहिल्यानें जोशी कमिटीच्या सभासदांचीं मनें विकल झालीं असें नव्हे. हिंदुस्थानांतल्या भिन्नभिन्न प्रांतांतल्या आणि भिन्नभिन्न जातींच्या आईबापांनीं, नवऱ्यांनीं, समाजसेवकांनीं जे स्वानुभव सांगितले,

आणि वकिलांनीं, परिचारिकांनीं, डॉक्टरांनीं ज्या शोकपूर्ण हकीगती निवेदन केल्या, त्या प्रत्यक्ष कानांनीं ऐकूनच त्यांच्या हृदयाची कालवाकालव झाली असली पाहिजे व बालविवाहाच्या बकासुरानें हिंदी राष्ट्राचा केवढा अपरिमित संहार चालविला आहे त्याचें भेसूर चित्र त्यांच्या डोळ्यांपुढें स्पष्ट उभें राहिलें असलें पाहिजे. कमिटीचा रिपोर्ट वाचणाऱ्या वाचकाला हा प्रत्यय येणें कठिण आहे. समाजविध्वंसक चालीरीतींच्या प्रश्नावर चवकशीमंडळ नेमलें जातें तेव्हां हाच एक मोठा तोटा होतो. मंडळाकडून जे आंकडे गोळा केले जातात त्यांत जागोजागीं शोकरसपूर्ण कहाण्या लपलेल्या असतात. पण त्या कहाण्या कल्पनेनें जाणण्याइतकी सहृदयता आणि बुद्धि कितीशा वाचकांच्या ठिकाणीं असणार ?

ज्यांच्या ठायीं ती असेल त्यांना जोशी कमिटीचा रिपोर्ट, विशेषतः त्यांतील डॉक्टर लोकांनीं सादर केलेल्या हकीगती वाचल्यावर मनःक्षोभ आंवरणें खचित अशक्य होईल. 'इंडिया ऑफिस'च्या वैद्यकीय सल्लागाराच्या जागेवर आतां नेमले गेलेले सर जॉन मेगॉ यांच्या हिशोबाप्रमाणें शेंकडा दहा टक्के हिंदी स्त्रियांना बाळंतपणांतच मृत्यु येतो व प्रतिवर्षीं दोन लक्ष हिंदी स्त्रिया प्रसूतिवेदनांनीं प्राणास मुकतात. प्रसूतींत घडणारा मृत्यु म्हणजे साधासुधा, नैसर्गिक, शांत मृत्यु नव्हे हें वाचकांनीं विसरूं नये. जुन्या काळांत हालहाल करून मारण्याची शिक्षा सांगत असत. तिचीच उपमा त्या मरणाला शोभेल. पण अशा भयंकर मृत्यूला बळी पडलेल्या अभागी स्त्रिया आपल्या दृष्टीआड मरतात, व त्यामुळें बालविवाहाचें खरें भेसूर स्वरूप आपल्या मनावर बिंबत नाहीं. कायदा व लोकमत या राक्षसी रूढीविरुद्ध त्वेषानें उठायला शतकोनुशतकें लागलीं याचें कारण कदाचित् हेंच असेल. आणि १९३० सालीं बालविवाहप्रतिबंधक कायदा पास झाला त्यानें तरी खरा कार्यभाग कितपत झाला हा प्रश्नच आहे. त्याचाच विचार यापुढें आपल्याला करावयाचा आहे.

## प्रकरण २ रें

जोशी कमिटीनें मुख्यतः दोन उपायांची शिफारस केली. एक संमतिवयाची किमान मर्यादा विवाहित स्त्रियांच्या बाबतींत पंधरा व अविवाहित स्त्रियांच्या बाबतींत अठरापर्यंत वाढवावी; आणि दुसरें, अल्पवयांत घडणारे स्त्रीसंभोग बंद करण्यासाठीं चवदा वर्षांच्या आंत मुलीचा विवाह करण्यास कायद्यानें मनाई करावी व असा विवाह शिक्षेस पात्र ठरवावा; असा विवाह झाल्यावर कायद्यानें तो रद्द मात्र करण्यांत येऊं नये.

या शिफारशींपैकीं संमतिवयाबद्दलच्या भागाकडे कुणीं विशेष लक्ष दिलें नाहीं. विवाहवयाच्या मर्यादेच्या शिफारशीचा मात्र ताबडतोब विचार केला गेला, व त्याबद्दलचा कायदाहि पास झाला. याचें कारण असें, कीं या कायद्याची पूर्वतयारी बहुतेक आधींच झालेली होती. १९२७ सालीं श्रीयुत सारडा यांनीं आणलेल्या बिलावर प्रांतिक सरकारांचे अभिप्राय मागविले ते हातीं आले होते. त्या बिलाचा 'सिलेक्ट कमिटी'नेंहि विचार केला होता, व ठराविक वयोमर्यादेच्या आंत घडलेला विवाह बेकायदा म्हणून रद्द करण्याचें मूळ सारडा बिलांतील कलम गाळून 'जोशी रिपोर्टांत' सुचविल्याप्रमाणें असला विवाह घडवून आणणाऱ्या व्यक्तींना शासन करावें असा अभिप्राय दिला होता. केवळ हिंदूंनाच नव्हे, तर हिंदु-

स्थानांतील सर्व जातींना लागू होईल असें व्यापक स्वरूप या बिलाला देण्यांत आलें व तें पुन्हा वरिष्ठ कायदेमंडळापुढें मांडण्यांत आलें. त्यावर कित्येक दिवस मोठा खडाजंगी वादविवाद झाला. अखेर ६७ विरुद्ध १४ अशा मताधिक्यानें तें पास झालें व ता. १ आक्टोबर १९२९ रोजीं त्यास कायद्याचें स्वरूप प्राप्त झालें.

सर्व सरकारी व युरोपियन सभासदांनीं या बिलास अनुकूल मत दिलें. हिंदुस्थान सरकारचे गृहमंत्री सर जेम्स क्रेरार यांनीं ता. ४ सप्टेंबर १९२९ रोजीं बिलावर भाषण करतांना या बिलावर शक्य तितक्या प्रकारें लोकमत प्रगट होण्याची संधि देण्यांत आल्याचा उल्लेख केला, जोशी कमिटीच्या रिपोर्टाची मोठी स्तुति केली, "बालविवाह म्हणजे देशाला जडलेला एक भयंकर रोग असून त्यावर ताबडतोब उपाय केला पाहिजे" अशी त्या रिपोर्टानें सरकारची खात्री पटली असल्याचें सांगितलें, व "या कायद्याविषयीं सरकारच्या अंतःकरणांत सर्वथव सहानुभूति असून सरकारकडून त्यास जोराचा पाठिंबा मिळेल" असे आश्वासनपर उद्‌गार काढले.

हे उद्‌गार लक्षांत घेतले म्हणजे हिंदी समाजसुधारकांच्या बरोबरीनें सरकारनेंहि सारडा कायद्याबद्दलची जबाबदारी आपल्या आावर घेतली होती, हें नाकबूल करतां येणार नाहीं.

आणि हेंहि नाकबूल करतां येणार नाहीं, कीं हा सारडा कायदा जवळजवळ सर्वस्वीं निष्फळ ठरला, इतकेंच नव्हे, तर ज्या बालविाहाच्या चालीचा प्रतिबंध करावयाच्या हेतूनें तो पास केला गेल ती दुष्ट चाल उलट प्रचंड प्रमाणांत त्यामुळें वाढली!

या विधानाचा चुकून अगर बुद्धिपुरस्सर विपर्यास करून कोण असें मात्र म्हणू नये, कीं पहा, सारडा कायदा निष्फळ आणि विपोतपरिणामी ठरला, तेव्हां फिरून यापुढें सामाजिक चालीरीतंच्या बाबतींत कायद्यानें सुधारणा करण्याचा प्रयत्न करूं नका. असें हणण्याचा मोह कोणाला होईल म्हणून सारडा कायदा कां

निष्फळ ठरला त्याचीं कारणें, व तो निष्फळ ठरला म्हणजे काय झालें, तें मी क्रमानें सांगतें.

प्रथम सारडा कायद्याचें स्वरूप आपल्याला नीट लक्षांत घेतलें पाहिजे.

हा कायदा ता. १ ऑक्टोबर १९२९ रोजीं पास झाला हें जरी खरें, तरी त्याचा प्रत्यक्ष अंमल सहा महिनेपर्यंत म्हणजे ता. १ एप्रिल १९३० पर्यंत करण्यांत येऊं नये असें स्पष्ट कलम त्यांत घातलें होतें. त्या मुदतीनंतर तो केवळ हिंदूंनाच नव्हे तर ब्रिटिश हिंदुस्थानांतील सर्व प्रजेला लागू व्हावयाचा होता.

पण कोणीतरी तक्रार दाखल केल्याखेरीज कोर्टानें गुन्हेगाराविरुद्ध खटला सुरू करूं नये असें त्यांत म्हटलें होतें.

तसेंच या कायद्यांत अशी अट होती, कीं गुन्ह्याची खबर ज्या कोणाला द्यावयाची असेल त्यानें ती जिल्ह्याच्या अगर प्रांताच्या कोर्टापुढें दिली पाहिजे, आणि आरोपीवर गुन्हा शाबीत झाला नाहीं तर नुकसानभरपाई म्हणून कोर्टानें हुकूम केल्यास शंभर रुपये आपण भरूं अशी हमी त्यानें आगाऊ दिली पाहिजे. कांहीं विशेष कारणांसाठीं कोर्टाला ही हमी माफ करावीशी वाटली व तीं कारणें कोर्टानें लेखी नमूद केलीं तरच ही हमी माफ होईल. गुन्हा सिद्ध झला तर बेकायदा लग्न करणारा नवरा ( तो सज्ञान असल्यास ), किंवा वधूचा पिता अगर पालक किंवा लग्नविधि करणारा पुरोहित यांपैकीं एकास अगर सर्वांस जास्तींत जास्त एक हजार रुपयांचा दंड, किंवा एक महिन्याचा बंदिवास, किंवा दंड व बंदिवास दोन्हीअशी शिक्षा कोर्टानें सांगावी. नवऱ्याचें वय अठरा ते एकवीस या दम्यान असेल तर त्याला व वधूला दंड करतां येईल, तुरुंगवासाची शिक्षा देतां येणार नाहीं.

अशा या कायद्याचे प्रत्यक्ष परिणाम काय झाले ते सांगायला कांहीं फार वेळ नको.

नि. १८८

माझ्या पार्लमेंटमधील प्रश्नांवरून स्टेट सेक्रेटरींनीं जे आंकडे मिळविले ते असे आहेत:– १९३२ सालच्या ऑगस्ट महिनाअखेर म्हणजे सारडा कायद्याचा अंमल सुरू झाल्यापासून दोन व वर्षें पांच महिन्यांच्या मुदतींत या कायद्यान्वयें एकंदर ४७३ खटले भरण्यांत आले. त्यांपैकीं ९८ खटल्यांचा निकाल लागावयाचा होता, २०७ खटल्यांत आरोपी दोषमुक्त ठरले, आणि फक्त १६७ दाव्यांत आरोपींस शिक्षा सांगण्यांत आली. त्यांत सुद्धां तुरुंगाची सजा अवघ्या १७ च दाव्यांत दिली गेली. सगळ्यांत जास्ती दावे पंजाबांत झाले. त्यांची संख्या १४६ होती. त्याच्या खालोखाल संयुक्त प्रांतांत ११० दावे झाले. बालविवाहाचा प्रचार सर्वांत अधिक बंगाल प्रांतांत असल्याचें जोशी कमिटीस आढळून आलें होतें, पण तेथें अवघे ४१ दावे दाखल झाले !

ही फलश्रुति निराशा करणारी तर आहेच, परंतु सारडा कायदा पास झाल्यावर सरकारनें जो अंगचुकारपणा केला त्याचे परिणाम भयंकर झाले.

वर मीं सांगितलेंच आहे, कीं सारडा कायद्याचा प्रत्यक्ष अंमल सुरू होण्यापूर्वीं सहा महिन्यांचा अवकाश ठेवण्यांत आला होता. लोकांना कायद्याची माहिती व्हावी व त्याबद्दल त्यांच्या मनाची अनुकूलता सिद्ध व्हावी या हेतूनेंच ही मुदत घालण्यांत आली असावी. पण हा हेतु सफल व्हावयाचा तर कायद्याबाबत मतप्रचार फार जोरानें करायला पाहिजे होता. अशा मतप्रचारासाठीं सरकारनें कांहीं योजना व खटपट केली अशी माहिती मिळत नाहीं. कायद्याच्या कैवाऱ्यांऐवजीं शत्रूंनीं मात्र सपाटून मतप्रचार केला. सरकार आतां बालविवाहाचा पक्का बंदोबस्त करणार, अशी ( आतां उगीचच म्हणायची ! ) समजूत झाल्यामुळें आणि आपल्या कमाईची एक मोठी बाबत नाहींशी होणार असें भय वाटल्यामुळें उपाध्ये लोकांनीं उघाडी आहे तोंवर कापणी करून घ्यायचें ठरविलें. वधू-वरांच्या आईबापांना, कर्ज देणाऱ्या सावकारांना सुद्धां उपाध्या

प्रमाणेंच भीति वाटली, कीं बालविवाह बंद झाला म्हणजे आपल्या धंद्याला मंदी येणार. म्हणून तेहि उपाध्यांना सामील झाले. हे दोन धूर्त वर्ग एकत्र मिळाल्यावर त्यांनीं केलेल्या खटपटी मोठ्या मासलेवाईक होत्या हें काय सांगायला पाहिजे ?

एका प्रांतांतली गोष्ट ऐकण्यासारखी आहे. तेथ सरकारनें काय केलें होतें तर सारडा कायद्याबद्दलचीं कांहीं थोडीं पत्रकें वांटलीं होतीं. तीं इंग्रजींत लिहिलेलीं आणि तींसुद्धां दुर्बोध भाषेंत. उलट सावकार-भटजी कंपूनें अगदीं कानाकोपऱ्यांतल्या खेड्यापाड्यापर्यंत— जेथें छपाईची सोय नसेल तेथें ढोलगें वाजविणाऱ्या दवंडीवाल्याचा उपयोग करून— सारडा कायद्याची खबर पोंचविली आणि ती पोंचवितांना त्यांनीं 'ध'चा 'मा' करण्यासहि कमी केलें नाहीं ! ता. १ एप्रिलनंतर चवदा वर्षांच्या आंतले विवाह सरकार बंद करणार आहे असें सांगण्याऐवजीं त्यांनीं दवंडी पिटविली, कीं सरकार आतां चवदा वर्षें विवाह बंद करणार आहे ! कांहीं ठिकाणीं त्यांनीं लोकांचा असा समज करून दिला, कीं यापुढें चवदा वर्षें लग्नाला मुळीं मुहूर्तच निघायचे नाहींत !

या नाहीं त्या युक्तीनें त्यांनीं लोकांना बनविलें खरें, व जो उठला तो आपल्या पोराबाळांचीं लग्नें उरकून टाकूं लागला. बालविवाहाच्या या धूमधडाक्यांत तान्ह्या पोरांचीं सुद्धां लग्नें झालीं आणि कित्येक गांवीं अक्षतींच्या आणि वरातींच्या वाद्यांनीं लोकांना झोंप मिळेनाशी झाली !

'कत्तल'च्या रात्रीसारख्या भासलेल्या त्या रात्रींत खरोखरच किती अजाण, निरपराध, असहाय्य बालकांची एक प्रकारें जन्माची कत्तल उडाली तें १९३१ च्या शिरगणतीचा रिपोर्ट १९३३ च्या उन्हाळ्यांत प्रसिद्ध झाला तेव्हां नीट कळून आलें. हिंदुस्थानची लोकसंख्या शेंकडा सुमारें साडेदहा टक्क्यांनीं वाढली, पण पंधरा वर्षांच्या आंतील विवाहित स्त्रियांची संख्या ८० लक्ष ५० हजारांवरून एकदम एक कोटी साडेबावीस लाखांवर गेली होती; पंधरा

वर्षांच्या आंतील विवाहित पुरुषांची संख्या पूर्वीं साडेबत्तीस लक्ष होती ती आतां साडेपंचावन्न लक्ष झाली होती, आणि पांच वर्षांच्या आंतल्या विवाहित मुली तर २१८,५०० होत्या—त्या आतां ८०२,००० झाल्या होत्या—म्हणजे त्यांची संख्या चौपट झाली होती ! १९२१ च्या शिरगणतींत अल्पवयी विधवांची संख्या सुमारें चार लाखांवरून सव्वातीन लाखांपर्यंत उतरलेली दिसली होती, ती आतां भयंकर वाढणार असें १९३१ च्या शिरगणतीवरून दिसलें. पांच वर्षांच्या आंतल्या विधवांची वाढ तर झालेलीच आढळून आली. पूर्वीं अशा बालविधवा १५००० होत्या तर आतां त्यांची संख्या ३१००० वर गेली होती !

तरी वर दिलेले आंकडे खऱ्या स्थितीचे निदर्शक नाहींत ! कारण सारडा कायद्यान्वयें आपल्याला शिक्षा होईल या भीतीनें कित्येक आईबापांनीं मुलांमुलींचीं लग्नें झालेलीं असूनहि शिरगणतीच्या वेळीं अविवाहितांच्या सदरांत त्यांना दडपून दिलें. अशा मुलांमुलींची संख्या दहापासून बारा लाखांपर्यंत असावी असें शिरगणतीच्या कमिशनरचें म्हणणें आहे. या विधानास त्यानें जो पुरावा दाखल केला आहे, तो सामान्य वाचकांस सहज समजेल अशा स्वरूपाचा नसल्यामुळें तो येथें देतां येत नाहीं.

सारांश, सारडा कायदा पास होऊन प्रत्यक्ष अमलांत येई-पर्यंतच्या 'षण्मासाच्या वायद्या'च्या घातुक कालावधींत निदान तीस लक्ष अल्पवयी मुली आणि वीस लक्ष मुलगे घाईघाईनें गृहस्थाश्रमांत ढकलण्यांत आले !

एक विलक्षण आश्चर्याची आणि दुर्दैवाची गोष्ट अशी, कीं बालविवाहितांचें प्रमाण सगळ्यांत मुसलमान जातींत अधिक वाढलें आणि सारडा कायद्याविरुद्ध सर्वांत अधिक ओरड मुसलमान समा-जानें केली. मुसलमानी धर्मशास्त्रानें बालविवाहाचा नियम घातला आहे अगर पुरस्कार केला आहे असें म्हणण्यास तर यत्किंचित्‌हि जागा नाहीं ! बालविवाहाची रूढि हें हिंदुधर्माचें एक वैशिष्टय असें

आपण पुष्कळदां ऐकतों. पण त्यांत सत्यांश नाहीं. अगदीं १९२१ च्या शिरगणतीकडे पाहिलें तरी हिंदूंपेक्षां मुसलमानांतलें बालविवाहाचें प्रमाण अवघ्या चार टक्क्यांनींच कमी असलेलें दिसतें; आणि आतां तर तें हिंदु जातींतल्या प्रमाणाहून वाढलें असून, कांहीं प्रांतांत तरी, दहा वर्षांच्या आंतल्या विवाहित स्त्रियांची मुसलमानांतली वाढ भलतीकडेच झाली आहे. त्याचप्रमाणें ज्या रानटी जातींत बालविवाहाची चाल पूर्वी नव्हती, त्यांच्यांतहि आतां तिचा प्रसार झाल्याचें १९३१ च्या शिरगणतीवरून आढळून येतें.

किती भयंकर हें एकंदर चित्र !

आणि या सगळ्या प्रकाराचें कारण काय, तर सारडा कायद्याचा अंमल करण्याच्या बाबतींत सरकारनें दाखविलेला दुबळेपणा आणि शिथिलता ! या कायद्याची दवंडी ज्यांना तो आपत्तीसारखा वाटत होता त्यांनीं दिल्यामुळें लोकांना त्याची जाणीव झाली होती, व त्यांना वाटलें होतें, सरकार आतां या नव्या कायद्याचा अगदीं कडक अंमल करणार! पण सरकार तसें वागलें कुठें ? आसाम प्रांताच्या शिरगणतीच्या रिपोर्टांत तर स्पष्ट म्हटलें आहे, कीं " सारडा कायद्यानें लोकांची उगीचच गडबड उडाली ! कारण हा कायदा नसल्यासारखाच दप्तरीं रद्दींत पडून राहिला ! " बहुतेक इतर प्रांतांच्या रिपोर्टांतहि या कायद्याबद्दल " जवळजवळ रद्द झालेला कायदा " असाच उल्लेख केलेला आढळतो ! म्हणजे स्वतःच मोठ्या गर्जना करून पास केलेला सारडा कायदा सरकारनें अल्पावकाशांत खुशाल रद्दींत टाकला म्हणायचा !

" कायद्याचा बोज राखण्यासाठीं " हे शब्द अलीकडे हिंदुस्थानांतल्या नोकरशाहीच्या ओंठांवर सदैव नाचत असतात ! पण सामाजिक सुधारणेसाठीं केलेले कायदे या तत्त्वाला अपवाद असावेत. हे कायदे करावयाचे ते अमलांत आणायसाठीं नव्हे, तर स्वतःच्या विवेकबुद्धीची टोंचणी व घरांतल्या आणि दारांतल्या टीकाकारांचीं

तोंडें बंद करण्यासाठीं करायचे असेंच एकंदरींत सरकारचें धोरण दिसतें !

सारडा कायद्यान्वयें जो पहिला खटला भरला गेला त्याच-वेळीं सरकारचें हें धोरण कसें उघड झालें पहा. एका खेडेगांवांत पाटलाच्या इशाऱ्याला न जुमानतां एका गृहस्थानें आपल्या दहा वर्षांच्या मुलीचें लग्न लावून टाकलें. त्याच्यावर खटला भरण्यांत आला व त्याला कायद्यांत सांगितलेली कमाल मर्यादेची, म्हणजे एक महिन्याची सजा सांगण्यांत आली. पण लगेच पंजाब सरकारनें स्थानिक अधिकाऱ्यांस तार करून त्या गृहस्थाची मुक्तता करण्याचा हुकूम सोडला. त्या वेळीं उत्तर हिंदुस्थानांत सारडा कायद्याबद्दल लोकांत जो तीव्र असंतोष पसरलेला होता, त्यानें सरकार बहुतेक भयभीत झालें असावें. कारण कांहींहि असो, सरकारनें ही गोष्ट केली खरी व वर्तमानपत्रांत या गोष्टीचा बभ्राहि झाला. पण या गोष्टीच्या आधींसुद्धां सरकारची सारडा कायद्या-बाबतची वृत्ति एका प्रसंगीं उघड झाली होती. शिरगणतीच्या रिपोर्टांत हा प्रसंग नमूद केलेला आढळतो. दिल्ली शहरीं म्हणजे सरकारच्या अगदीं बालेकिल्ल्यांत-- तेरा वर्षांच्या एका मुसलमान मुलाचें व नऊ वर्षांच्या मुलीचें लग्न जुम्मा मशिदींत मोठ्या समारंभानें करण्यांत आलें. या समारंभास १२००० मुसलमान लोक हजर होते आणि हें लग्न झालें केव्हां ? तर सारडा कायदा अमलांत येण्याची तारीख उलटल्यावर चारच दिवसांनीं ! या बालविवाहाबद्दल खटला भरण्यांत यावा अशी डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटकडे लोकांनीं विनंति केली; पण खटला भरण्यांत आला नाहीं ! मद्रासमध्यें एका मुनसफानें सारडा कायद्याचा भंग केला म्हणून कलेक्टरनें त्यास बडतर्फ केलें; पण वरिष्ठ अधि-ऱ्यांनीं त्यास फक्त समज देऊन नोकरीवर परत नेमलें. सरकारच्या या वागणुकीवरून सारडा कायद्याचा सरकारला कितपत बोज ठेवा-यचा आहे हें उघडच झालें, व त्यावरून काय तें उमजून ठिकठिका-

णच्या कोर्टांनींहि खटले सुनावणीस आले कीं नांवाला क्षुल्लक शिक्षा देऊन आरोपीस सोडून देण्याचा क्रम ठेवला. बंगालमध्यें दोन मुसलमान भाऊभाऊ होते. एक पंचेचाळीस वर्षांचा व दुसरा पन्नास वर्षांचा होता. त्यांच्या पालकत्वाखालीं दोन मुली होत्या. त्यांचीं वयें—एकीचें दोन व एकीचें चार अशीं होतीं. या मुलींच्या इस्टेटी गिळंकृत करण्याच्या हेतूनें या महाभागांनीं त्यांच्याशीं लग्नें लावलीं ! त्यांच्यावर खटला करण्यांत आला तेव्हां कोर्टानें त्यांना प्रत्येकीं किती दंड केला सांगूं ?— एकदम दीडशें रुपये ! कायद्यांत कमाल शिक्षा हजार रुपये आणि एक महिन्याचा तुरुंगवास अशी सांगितली आहे ! दीडशें रुपये दंडाची त्या आरोपींना कितीशी फिकीर वाटली असेल तें उघडच आहे ! लग्न लावून त्यांनीं मोठमोठ्या इस्टेटी घशाखालीं घालून आधींच ढेंकर दिली होती !

कांहीं शहरांत समाजसुधारणेसाठीं झटणाऱ्या सार्वजनिक संस्थांनीं बालविवाहप्रतिबंधाचें काम केलें. गुजराथेंतील 'सोशल रिफॉर्म ॲसोसिएशन ' नें बरेच बालविवाह बंद पाडले. यांपैकीं एक-दोन उदाहरणांत तर सहा वर्षांच्या मुलीचें पन्नास वर्षांच्या पुरुषाशीं लग्न लागावयाचें होतें. मुंबईच्या ' यूथ लीग ' नांवाच्या संस्थेनें बारा वर्षांच्या एका रोगी मुलाचें लग्न होणार होतें त्याला विरोध केला. या नवरदेवाची एक बायको जिवंत असून त्याचा द्वितीय विवाह होणार होता. दुर्दैव असें, कीं ब्रिटिश हद्दीच्या बाहेर सारडा कायद्याचा अंमल नाहीं याचा फायदा घेऊन त्या मुलाचा तो विवाह साजरा करण्यांत आला. पुढें लवकरच तो मुलगा वारला, आणि त्याच्या मागें दोन बालविधवा राहिल्या ! नाशिक शहरीं एका दहा वर्षांच्या ब्राम्हण मुलीचें तिचा बाप शोभेल अशा एका अष्टवक्र, पंगु पुरुषाशीं लग्न लावणार होते त्याविरुद्ध एका शेजाऱ्यानें कोर्टांत तक्रार केली, व कोर्टानें त्या लग्नाला प्रतिबंध केला.

पण एखाद्या व्यक्तीनें अगर संस्थेनें धैर्यानें पुढाकार घेऊन बालविवाह थांबविल्याचीं असलीं उदाहरणें फार थोडीं.

जोशी कमिटीनें तर आपल्या रिपोर्टांतच सरकारला इषारा दिला होता, कीं "सारडा कायद्याचा भंग होत असल्याची वर्दी सार्वजनिक संस्थांनीं द्यावी असें सरकार समजून चालणार असेल तर साराच प्रकार हास्यास्पद होईल. कारण, अशा सुसंघटित संस्था आधीं देशांत फार ठिकाणीं नाहींत. शहरांत असली एखादी संस्था असते, पण खेड्यापाड्यांत असणें शक्यच नाहीं; तेव्हां असल्या संस्थांकडून वर्दी मिळाल्यावर जागें व्हायचें सरकार ठरविणार असेल तर सुधारणेच्या नकाशावरून सरकारनें खेडीपाडीं मुळीं पुसूनच टाकावींत !"

पण कमिटीच्या या इशाऱ्याकडे सरकारचें लक्ष राहिलें नाहीं. कसें राहणार ? सारडा कायदा एकदां पास झाल्यावर सरकारला मुळीं त्याची वास्तपुस्त घ्यायचीच नव्हती असें दिसतें ! सगळ्या प्रांतांच्या शिरगणतीचे अधिकारी 'जवळ जवळ रद्दींत पडलेला कायदा' असा सारडा कायद्याचा आपापल्या रिपोर्टांत उल्लेख करतात, हें मीं यापूर्वींच सांगितलें आहे. बिहार-ओरिसा प्रांताच्या रिपोर्टांत म्हटलें आहे, कीं "सारडा कायदा म्हणजे काय प्रकरण आहे त्याची बहुतेक खेड्यापाड्यांतल्या लोकांना अजूनहि दादसुद्धां नाहीं. शहरांतल्या लोकांना थोडीफार दाद आहे, पण तेथेंसुद्धां खुशाल पोलिसांच्या आणि अधिकाऱ्यांच्या डोळ्यांदेखत बालविवाह धडकून होत असतात, व ते करणाऱ्यांना शिक्षेची यत्किंचित्सुद्धां दहशत वाटत नाहीं ! एका दुर्धारक मुसलमानानें तर आम्हांला विचारलें, कीं "अहो, आम्हीं सगळ्या गांवकऱ्यांनीं पक्की एकजूट करून बालविवाह घडवून आणला तर त्याविरुद्ध तक्रार दाखल करायला उरणार कोण, आणि तुमच्या सारडा कायद्याची अंमलबजावणी होणार कशी ?"

मला ज्या दोन गोष्टींकडे वाचकांचें विशेष लक्ष वेधायचें आहे, त्या दोन गोष्टींचा या उताऱ्यांत निर्देश आहे. सारडा कायदा

निष्फळ कां ठरला हें आपण पाहूं लागलों, कीं याच दोन गोष्टी आपल्या दृष्टीपुढें येतात.

एक गोष्ट ही, कीं सरकारनें अगदीं जाणूनबुजून त्या काय-द्याची आबाळ केली.

आणि दुसरी गोष्ट अशी, कीं त्या कायद्यांतलीं कलमेंच अशीं होतीं, कीं त्यामुळें कार्यसिद्धि अशक्यप्राय व्हावी !

सारडा कायद्यावरच्या चर्चेच्या वेळीं "देशाला लागलेली भयंकर क्षयकारक व्याधि" असें सरकारच्या खुद्द गृहमंत्र्यांनीं बालविवाहाचें वर्णन केलें होतें व "यावर उपाययोजना होण्यास क्षणाचाहि विलंब होतां कामा नये" असेहि उद्गार काढले होते. पण या कायद्यान्वयें होणाऱ्या गुन्ह्याविरुद्ध तक्रार करणाऱ्याचें काम कोणाच्या खांद्यावर टाकलें गेलें ? सरकारच्या नव्हे, तर खासगी व्यक्तीच्या ! गुन्ह्याची खबर देण्याचा खाजगी व्यक्तीला मोह वाटावा अशी तरी कांहीं योजना कायद्यांत केली गेली का ? मुळींच नाहीं. उलट दाव्याचा निकाल कसाहि झाला तरी वधूच्या व वराच्या दोन्ही पक्षांतील माणसांची त्याच्यावर इतराजी व्हावयाची ही खात्री राहिली. दावा खोटा ठरला तर तक्रार करणाऱ्याचे शंभर रुपये जायचे हें ठरलेलें ! बरें, दावा खरा ठरला तरी जिच्या हितासाठीं तो करायचा त्या विवाहित मुलीची विवाहाच्या संकटांतून सुटका थोडीच होणार ? उलट दाव्यानें चिडून जाऊन त्या बिचारीवर तिचा नवरा व त्याच्या कुटुंबांतलीं माणसें सूड उगवणार हेंच निश्चित ! जणूं विवाह झाला तो कायदेशीरच झाला अशा थाटानें तो कायमच राहणार !

सारडा बिल प्रथम तयार झालें तेव्हां बालविवाह रद्द करण्याचा अधिकार कोर्टाला देण्याचें जें कलम त्यांत होतें तें गाळायला नको होतें अशी कित्येकांनीं कडक टीका केली आहे. पण ही टीका मात्र व्यर्थ होय. कारण विवाहबंधन अविच्छेद्य होय ही हिंदु-धर्मांतली मूलभूत कल्पना. तिच्यावर आघात केला असता, कीं

धर्म व कायदा यांचा तीव्र विरोध उत्पन्न होऊन लोकमताशीं मोठीच झुंज केल्यासारखें झालें असतें. शिवाय, अपत्यांचा कायदेशीरपणा आणि वारसाहक्क इत्यादि बाबतींतहि बिकट प्रश्न उद्भवले असते; आणि असल्या बिलाला सरकारकडून कधींच संमति मिळाली नसती.

मात्र ही बाब सोडून दिली तर कायदा ज्यायोगें अधिक परिणामकारक होईल अशीं तीन कलमें त्यांत घालण्याजोगीं होतीं. एक तर, कायद्याचा भंग झाल्याची माहिती खाजगी रीतीनें जरी कोणीं दिली तरी योग्य चवकशीअंतीं ती साधार आहे असें वाटल्यास कायद्याचें अतिक्रमण करणाऱ्यावर खटला भरण्याचा अधिकार कोर्टास द्यावयास हवा होता. इतर कांहीं गुन्ह्यांच्या बाबतींत असा अधिकार कोर्टास असतो. दुसरें एक कलम कायद्यांत असें हवें होतें कीं, ज्यायोगें एखाद्या बालविवाहाची माहिती लागतांच तो थांबविण्याचा हुकूम कोणाहि व्यक्तीस मागतां आला असता व कोर्टास देतां आला असता. गंमत अशी, कीं कायद्यांत असें कलम नसूनहि कांहीं ठिकाणीं डिस्ट्रिक्ट जज्जांकडून असा हुकूम देण्यांत आला; परंतु अशा उपायाचें व्यावहारिक महत्त्व फार थोड्या लोकांच्या ध्यानांत आलें. तिसरें एक असें कलम कायद्यांत घालणें इष्ट होतें, कीं ज्यायोगें सारडा कायद्याविरुद्ध एखाद्या मुलीचा विवाह झाल्यास ती सज्ञान होईपर्यंत, अगर ती नवऱ्याच्या घरीं नांदावयास जाण्यासारखी होईपर्यंत तिनें नवऱ्यापासून विभक्त रहावें व नवरा सज्ञान असल्यास त्यानें, नाहींतर त्याच्या पालकानें तोंपर्यंत तिचा पोटगीखर्च द्यावा, असा हुकूम कोर्टास देतां आला असता.

पण या गोष्टींचा विचारच कोणीं केला नाहीं; इतकेंच नव्हे, तर प्रत्यक्ष कायद्यांत दाखल करतां न येण्यासारख्या ज्या कित्येक आवश्यक योजनांची शिफारस जोशी कमिटीच्या रिपोर्टांत स्पष्टपणें केली होती, त्यांकडेहि कोणीं कधीं लक्ष पुरविलें नाहीं. जोशी कमिटीनें सुचविलेल्या गोष्टींपैकीं मुख्य या होत्या—

(१) विवाहासंबंधींच्या व संमतिवयाच्या कायद्यांचीं सारीं कलमें देशांतल्या एकूणएक लोकांस माहित व्हावींत यासाठीं फार मोठ्या प्रमाणावर त्यांची प्रसिद्धि व मतप्रचार करावा. हें कार्य अत्यंत महत्त्वाचें आहे असें आम्हांस वाटतें; व ज्या ठिकाणीं स्त्रियांच्या संघटित संस्था असतील तेथें त्यांस द्रव्यसहाय्य देऊन त्यांजकडून हें थोडेंबहुत करून घेतां येण्यासारखें असलें, तरी हें बहुतांशीं सरकारनें स्वतःच केलें पाहिजे. ( हें शेवटचें वाक्य कमिटीनें जाड टाइपांत छापलें होतें ! )

(२) प्रत्येक लग्नाची बिनचूक नोंदणी होईल, व त्या नोंदणींत वधूवरांचें वय वगैरे सान्या गोष्टींचा अंतर्भाव होईल अशी सरकारनें आपल्या एखाद्या खात्याकडून व्यवस्था करावी. ही नोंद सुलभ व्हावी म्हणून प्रत्येक लग्नाची वर्दी वधूवरांनीं अगर त्यांच्या पालकांनीं स्थानिक अधिकान्यांकडे दिलीच पाहिजे असा हुकुम काढावा.

(३) मूल जन्मल्याबरोबर त्याच्या जन्माची वर्दी सरकारांत दिली पाहिजे अशी सर्वत्र सक्ति करावी, आणि मुलाचें लिंग व नांव यांचीहि नोंद राहील अशी व्यवस्था करावी.

(४) जन्म व लग्न यांच्या नोंदणीचे दाखले योग्य त्या इसमांस सरकारकडून मोफत मिळावेत.

(५) संभोगविषयक गुन्ह्यांचा तपास व पुढें निकाल करण्यासाठीं पोलिस, डॉक्टर, ज्यूरर इत्यादींच्या कामावर स्त्रियांची नेमणूक करावी.

या सर्व सूचनांचा सयुक्तिकपणा उघड आहे. संमतिवयाचा प्रश्न कायद्याच्या सहाय्यानें सोडविण्याचे पूर्वीचे प्रयत्न कोणत्या कारणांनीं निष्फळ झाले, त्याविषयीं पुढें आलेल्या साक्षीपुराव्याचा पूर्ण विचार करूनच कमिटीनें या सूचना केल्या होत्या. कायद्यानें घालून दिलेल्या वयोमर्यादेचें अतिक्रमण घडलें किंवा नाहीं हें ठरवायचें म्हणजे वधूवरांच्या वयांची नोंद सरकारजवळ असावयास नको काय ? बहुतेक बालविवाहांत मुली इतक्या

[stamp]

अल्पवयी असतात, कीं तेथें संशयाला जागाच नसते हें खरें; पण जेथें संशयाला जागा असेल तेथें गुन्ह्याचा निवाडा करायचा कसा? गोषांतल्या, अगर गोषाबाहेर असल्या तरी विलक्षण विनय पाळणाऱ्या मुलींच्या आणि त्यांच्या आयांच्या साक्षी घ्यायच्या म्हणजे पोलिसांचीं व ज्यूरींचीं कामें स्त्रियांकडे सोंपवायला नकोत का? आणि, सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे, कायद्याच्या अज्ञानानें लोकांकडून गुन्हे घडतात तर कायद्याची माहिती साऱ्या प्रजेला होईल अशी अहर्निश खटपट सरकारनें करायला नको? सारांश, जोशी कमिटीनें ज्या शिफारसी केल्या, त्या पूर्ण विचाराअंतीं केल्या होत्या.

परंतु, मीं जी माहिती गोळा केली आहे तिच्यावरून असें स्पष्ट दिसतें, कीं एकाहि प्रांतिक सरकारनें अगर वरिष्ठ सरकारनें त्या शिफारशींप्रमाणें वागण्याचा प्रयोगसुद्धां करून पाहिला नाहीं. १९३० पासून १९३३ पर्यंतच्या तीन वर्षांत सारडा कायद्याची अंमलबजावणी कशी काय होत आहे हें अजमावण्यासाठीं मीं एकंदर तेरा वेळां पार्लमेंटमध्यें प्रश्न विचारले; पण 'सरकार या गोष्टीचा विचार करीत आहे' या ठरीव ठशाच्या पोकळ उत्तराखेरीज दुसरें उत्तर मला कधीं मिळालें नाहीं. अखेर ता. १८ डिसेंबर १९३३ रोजीं माझ्या प्रश्नाला सरकारकडून उत्तर मिळालें, कीं "सरकारला व्यवहार्य वाटतील ते उपाय सरकार करील. परंतु जे उपाय सुचविले गेले आहेत ते सद्य:स्थितींत अनेक कारणांनीं अव्यवहार्य आहेतसें सरकारला वाटतें." लोकमत तयार करण्याच्या प्रश्नावर सरकारकडून असा जबाब मिळाला कीं, 'बालविवाहाचे परिणाम किती भयंकर आहेत ते लोकांच्या मनावर बिंबतील अशी खटपट केली पाहिजे हें खरें; पण ही खटपट सरकारनें करण्यापेक्षां लोकांच्या सार्वजनिक संस्थांकडून व्हावी हेंच योग्य होय.' सबंध हिंदुस्थानांत मिळून अशा संस्था बोटांवर मोजण्याइतक्याहि नाहींत ही गोष्ट कांहीं सरकारला ध्यानांत घ्यावीशी वाटली नाहीं! तब्बल तीन वर्षें विचार करून सरकारनें अखेर ठरविलें, कीं सारडा कायद्याचें

परिपालन लोक आपखुशीनें करतील अशा प्रकारें त्यांचीं मनें वळविणें अगर त्यांजवर सक्ति करणें यांपैकीं एकहि गोष्ट आपल्याला कर्तव्य नाहीं ! आणि हा कायदा पास व्हायच्या वेळीं त्यास 'जोराचा पाठिंबा' देण्याचें वचन मात्र सरकारनें ऐटींत दिलें होतें.

मीं सन १९३२ च्या वसंत ऋतूंत दोन महिने हिंदुस्थानांत घालविले त्या वेळीं मतदानाच्या हक्कासंबंधीं माहिती मिळविण्यासाठींच जरी मुख्यतः मी फिरलें, तरी प्रत्येक प्रमुख शहरीं गेल्यावर तेथील सरकारी अधिकाऱ्यांना, कायदेमंडळाच्या सभासदांना व पुढाऱ्यांना भेटून त्यांच्याशीं सारडा कायद्याबद्दल चर्चा करण्याचा मीं कटाक्ष ठेवला होता. या संभाषणावरून एकदम एखादा मोठा सिद्धान्त मी काढूं नये हें खरें; पण जोशी कमिटीच्या रिपोर्टानें हिंदी समाजाच्या करुण स्थितीचें सत्यचित्र काढून दाखविलेलें पाहतांच ज्या तळमळीनें व कळकळीनें हिंदुस्थानांतील सारे विचारवंत स्त्रीपुरुष सारडा कायदा या नाहीं त्या उपायांनीं परिणामकारक करण्याच्या मार्गाला लागले असतील अशी माझ्या मनाची कल्पना झाली होती, त्या तळमळीचा व कळकळीचा मागमूसहि मला कोठें दिसला नाहीं, एवढें मला खचित म्हणतां येईल ! सारडा कायद्याचा अंमल सक्तीनें केला तर आपली लोकप्रियता कमी होईल या विचारानें सरकारनें माघार घेतली असावी असें माझ्या मनांत क्वचित् येई. पण याबाबत मि. एडवर्ड टॉमसन यांचे असे उद्गार आहेत, कीं 'सारडा कायद्याचा अंमल सरकारनें सक्तीनें केला तरी त्यापासून सरकारच्या इभ्रतीला अगर लोकप्रियतेला यत्किंचितहि धक्का लागणार नाहीं !' –('A letter from India').

सारडा कायद्याच्या दुर्दशेचें येथवर केलेलें वर्णन वाचून कांहीं वाचक कदाचित् म्हणतील,

'या प्रकाराचें खरें खापर सरकारपेक्षां हिंदी लोकांवरच फोडलें पाहिजे. बालविवाहाच्या बकासुराला सरकारचें कोणी नव्हे तर हिंदी लोकांच्याच आयाबहिणी बळी पडत होत्या ना ? मग

त्यांनींच सारडा कायद्याची जोपासना करायला नको होती का ? पण त्यांनीं सनातनी हटवादाचा बागुलबोवा दाखवून सरकारला इतकें भेवडावलें, कीं मूग गिळून स्वस्थ बसण्यांत सरकारला शहाणपणा वाटावा. ज्या हिंदी सुधारकांनीं कायद्याची मागणी केली व त्यासाठीं चळवळ केली त्यांनींच त्यांत अव्यवहार्य कलमें राहणार नाहींत अशी खबरदारी घ्यायला हवी होती; लोकांत जागृति व मत-प्रसार करण्याची कामगिरी सार्वजनिक समाजसुधारक संस्थांनीं करायला हवी होती. पण लोकांच्या संस्थांनीं अगर पुढाऱ्यांनीं काय केलें ? कांहींसुद्धां नाहीं ! मग उगीच सरकारवर टीकेची झोड कां ? शिवाय, चेम्सफर्ड सुधारणांच्या निमित्तानें देशांत उठलेल्या वादविवादाच्या वावटळी, त्यानंतरच्या राजकीय मुलाखती व सभा, आणि सविनय कायदेभंगाची प्रचंड चळवळ इत्यादि राजकीय घडामोडींनीं अधिकाऱ्यांचीं व पुढाऱ्यांचीं मनें इतकीं थकून गेलीं कीं, सामाजिक सुधारणेंत लक्ष घालायला त्यांना वेळ आणि उत्साह राहिला होता कुठें ? '

पण कोणीं सरकारची अशी तरफदारी केली तर मी ती ग्राह्य मानणार नाहीं. कारण, सारडा कायद्याबद्दल सरकारच्या अंतःकरणांत खरी कळकळ असती तर लोकांच्या विरोधाची फिकीर न करतां त्याची सक्तीनें अंमलबजावणी करून सरकारनें तो कायदा यशस्वी करून दाखविला असता असें माझें मत आहे आणि हें मत मीं उगीच करून घेतलेलें नाहीं. हिंदुस्थानच्या इतिहासांतल्या एका मोठ्या दाखल्याचा मला आधार आहे. लॉर्ड बेंटिक हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल होता तेव्हां त्यानें 'सतीची चाल ताबडतोब बंद झाली पाहिजे ' असा वटहुकूम काढून ती चाल बंद केली, हें इतिहासांत नमूद आहे. पण हें फारच थोड्या लोकांना माहीत आहे, कीं सारे सल्लागार अधिकारी विरुद्ध असतांना लॉर्ड बेंटिकनें आपल्या आत्मविश्वासाच्या जोरावर तो वटहुकूम काढला होता. सती बंद झाली पाहिजे असें म्हणणारा समाजसुधारकांचा अग्रणी राममोहन

रायदेखील कायद्याची घाई नको म्हणून कचरत होता. बेंटिकच्या अगोदरचा गव्हर्नर जनरल लॉर्ड ॲम्हर्स्ट यानें तर एका भाषणप्रसंगीं म्हटलें होतें, कीं सतीची चाल भयंकर तर खरीच, पण ती नष्ट करण्याची जबाबदारी शिरावर घेण्याऐवजीं सरकारनें असा विचार केलेला बरा, कीं लोक जसजसे अधिकाधिक सुशिक्षित व समजूतदार होतील, तशी टाकतील हळुहळु ही अमानुष चाल.

समाजसुधारणेच्या बाबतींत अलीकडे नोकरशाहीनें ॲम्हर्स्ट-साहेबांच्या विचारसरणीचा कित्ता पुढें ठेवलेला दिसतो. वरिष्ठ कायदेमंडळांत सारडा बिलावर वादविवाद चालला होता तेव्हां सर अलेक्झँडर मुडिमन यांनीं काय उद्गार काढले होते पहा—

'१८९१ चा संमतिवयाचा कायदा होतांच ज्या प्रांतांत विलक्षण जोराचा असंतोष उद्भवला, त्या प्रांतांशीं माझा संबंध असल्यानें या बाबतींत आपण फार जपून वागलें पाहिजे असें मला वाटतें. सामाजिक सुधारणा सरकारनें घडवून आणूं नये असें माझें म्हणणें नाहीं. पण या सुधारणेंत पहिली उचल प्रजेकडून झाली पाहिजे. माझे विचार जुन्या थाटाचे आहेत असें कोणीं म्हटलें तरी मला चालेल, पण मला आपलें असें वाटतें, कीं लोकमताचा पाठिंबा नसतांना समाजसुधारणेची घाई केल्यानें संकटें मात्र ओढवतील. त्यापेक्षां काय करावयाचें तें आस्ते आस्ते करावें; मग कोणीं आपल्याला मंदगति म्हणून नांवें ठेविलीं तरी हरकत नाहीं! बाल-विवाहाची चाल अत्यंत घातुक आहे याबद्दल दुमत असणें शक्यच नाहीं. पण ज्या सन्मान्य सभासदांनीं हें बिल पुढें आणलें आहे, त्यांना सामान्य जनतेचा पाठिंबा नाहीं असा इषारा त्यांस देणें भाग आहे आणि जनतेचा पाठिंबा नसलेलें हें बिल पास झालें तर पुढें दूषणें व संकटें कोणाला सोसावीं लागतील? हे सन्मान्य सभासद राहतील बाजूला, आणि सरकारच्याच वांट्याला ती येतील!'

संकटें व दूषणें!

खरेंच! केवढी पण सरकारला दूषणांची चाड! आपल्याला हवी ती गोष्ट साध्य करावयाची असली म्हणजे सरकार ही चाड किती

बाळगतें तें जसें कांहीं आम्हांला माहीतच नाहीं ! आणि मी म्हणतें, सारडा कायद्याच्या बाबतींत संकटाला व दूषणाला तोंड द्यावें लागलें असतें तरी सरकारनें द्यायला नको होतें काय ? महत्-कृत्याच्या वेळीं दूषणाची भीति बाळगायची नसते ! आणि असंख्य बालिकांस मृत्यूच्या दाढेंतून बाहेर काढण्यापेक्षां, आणि सबंध राष्ट्राचें शरीर पोखरणारा व्रण कापून काढण्यापेक्षां अधिक मोठें पुण्यकृत्य दुसरें कोणतें असेल तें मला तरी कळत नाहीं ! पण सरकारनें सारडा बिलाला मारे 'जोराचा पाठिंबा' दिला, आणि त्या बिलाला कायद्याचें स्वरूप आलें तेव्हां मात्र मूर्ख आणि धर्मवेड्या लोकांच्या विरोधाला भिऊन कायद्याची प्रसिद्धि, अंमल अगर समर्थन कर-ण्याच्या कर्तव्याला खुशाल बगल दिली ! विसाव्या शतकांत ॲम्हर्स्टसाहेबांचे अवतार पुष्कळ झाले, पण दुसरा एखादा लॉर्ड बेंटिक कांहीं अवतीर्ण झाला नाहीं !

या उद्वेगजनक परिस्थितीवर आपल्याला कांहीं उपाय योजतां येईल, व जें झालें तें होऊन गेलें, पुढचा काळ तरी अधिक उज्ज्वल करावा या दृष्टीनें आपण कसें वागलें पाहिजे, हा विचार महत्त्वाचा आहे. तोच आतां यानंतर करूं.

## प्रकरण ३ रें

सारांश, आजघटकेला सारडा कायद्याची स्थिति किती केंविलवाणी आहे पहा ! स्वयंस्फूर्तीनं कायद्याचे विधिनिषेध बाळगणारे जे मूठभर लोक देशांत असतील तेवढ्यांच्याच मनावर त्या कायद्याचं काय दडपण असेल तेवढं; बाकी त्या कायद्याला रद्दींत टाकलेल्या खडर्याहून अधिक किंमत नाहीं ! त्या कायद्यांत अवश्य ती दुरुस्ती करून घ्यायची वरिष्ठ सरकारला आणि वरिष्ठ कायदे-मंडळाला इच्छाहि नाहीं व सवडहि नाहीं ! सनातनी पक्षाच्या विरोधाची त्यांनीं धास्ती घेतली आहे आणि राजकारणाच्या भानगडींत त्यांचं सारं चित्त गढलेलं आहे ! प्रांतिक सरकार व प्रांतिक कायदे मंडळ यांचीहि हीच गत. सारडा कायद्याचा जो कांहीं अंमल करतां येण्यासारखा आहे तोसुद्धां मनःपूर्वक करायला त्यांना फुरसत नाही ! त्यामुळं बालविवाहरूपी बकासुर १९२९–३० च्या सहामाहींत मिळालेल्या ५० लक्ष मुलांमुलींच्या आहुतीची ढेंकर देऊन प्रतिवर्षीचा नैवेद्य गट्ट करण्यासाठीं आपला जबडा पसरून निर्धास्तपणें बसलाच आहे !

यावर इलाज काय ?

सारडा कायदा अधिक फलदायी करण्यासाठीं त्यांत तीन दुरुस्त्या करतां येण्यासारख्या आहेत; या दुरुस्त्या मागं एके ठिकाणी

मीं नमूद केल्या आहेत. वास्तविक या दुरुस्त्या अशा आहेत, कीं त्या केल्यानं कोणाचा असंतोष पत्करावा लागेल अशी सरकारला भीति वाटण्याचं कांहीं कारण नाहीं. पण हिंदुस्थानांतील सध्यांच्या राजकीय परिस्थितीची ज्यांना पूर्ण माहिती आहे, अशा लोकांशीं याबद्दल मीं चर्चा केली, तिचा निष्कर्ष असा दिसतो, कीं सारडा कायद्यांत दुरुस्त्या करणारं बिल कोणीं पुढं आणलं तर त्याला सरकारचा पाठिंबा मिळण्याची आशा नाहीं.

ज्या राक्षसी रूढीमुळं लक्षावधि स्त्रियांचं जीवित मातीमोल होत आहे, ती नष्ट करण्याच्या बाबतींतलं सरकारचं औदासीन्य पाहिलं, कीं असं वाटूं लागतं, कीं स्त्रियांच्या हितसंबंधांत एखाद-दुसरा कायदा करण्यापेक्षां खरं पाहतां एक मोठी मूलभूत सुधारणा घडवून आणण्यासाठींच स्त्रियांनीं व स्त्रियांचा कैवार घेणाऱ्या पुरुषांनीं यापुढं झटलं पाहिजे. ती मूलभूत सुधारणा म्हणजे स्त्रियांस मतदानाचा हक्क आणि राज्यकारभारांतला वांटा पुरुषांच्या बरोबरीनं मिळेल असं करणं. आजपर्यंत हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत स्त्रियांना मुळीं कुठं स्थानच मिळालेलं नाहीं; सारी सत्ता पुरुषांची, अशी स्थिति चालत आली. स्त्रिया शिकल्यासवरल्या, मास्तरणी झाल्या, डॉक्टरणी झाल्या, पण स्त्रियांच्या खऱ्या गरजा समजून घेऊन त्यांच्या दुःखनिवारणाची सत्ता ज्यायोगें हातीं येईल अशा एकाहि जबाबदारीच्या जागेवर स्त्री नेमली गेली नाहीं. प्रांतिक कायदे मंडळांत स्त्रिया किती ? तर एक किंवा क्वचित् दोन. वरिष्ठ कायदेमंडळांत किती ? शून्य ! म्युनिसिपालिटयांत एखाददुसऱ्या स्त्रीचा शिरकाव झाला कीं शिकस्त झाली ! आधींच हिंदुस्थान देशांत मतदारांची संख्या असावी त्यापेक्षां कितीतरी मर्यादित, आणि त्यांतूनहि स्त्रियांच्या वांटयाला मतदानाचा हक्क कंजुषाच्या हातून सुटणाऱ्या दानासारखा आलेला ! वीस पुरुष-मतदारामागं एक स्त्री-मतदार असं आजपर्यंत प्रमाण होतं ! अशा परिस्थितींत कोटयवधि स्त्रियांची गांजणूक व कुचंबणा वर्षानुवर्षं चालत राहिली यांत

कांहीं आश्चर्य नाहीं. मात्र या प्रकारावरून एक बोध घेतला पाहिजे तो हा, कीं स्त्रियांची कायदेशीर दुर्दशा थांबवावयाची असेल तर कायदे मंडळांत स्त्रियांचा शिरकाव अधिक प्रमाणांत झाला पाहिजे. अन् मतदानाचा हक्क शक्य तितक्या अधिक प्रमाणांत स्त्रियांना मिळाला पाहिजे.

मी म्हणतें ही विचारसरणी इतकी उघड आहे, कीं हिंदी सुधारणांचा नवा कायदा घडला जाण्यापूर्वी त्यावर विचार करणाऱ्या प्रत्येक कमिशनानं, कमिटीनं अन् सभेनं स्त्रीमतदारांची संख्या वाढविण्याची जोराची शिफारस केलेली आढळते. शिफारस करतांना सायमन कमिशननं काढलेले उद्गार सदैव लक्षांत ठेवण्यासारखे आहेत. ते असे– "हिंदी स्त्रियांचें शिक्षण इतकें अल्प आहे अन् बाहेरच्या जगाचा अनुभव त्यांना इतका थोडा आहे, कीं त्यांना विस्तृत प्रमाणावर मतदानाचा हक्क देणें घातुक ठरेल असा कांहीं लोक आक्षेप घेतील, पण आम्हांला तसें मुळींच वाटत नाहीं. स्त्रियांच्या कल्याणाच्या व बालसंगोपनासारख्या अनेकविध प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठीं हिंदी स्त्रिया पुढें सरसावून चळवळ करूं लागल्या आहेत. या चळवळींत प्रत्यक्ष भाग घेणाऱ्या स्त्रियांची संख्या अल्प असली तरी तिच्यांत प्रतिबिंबित होणारी जागृति फार महत्त्वाची आहे. या जागृतीच्या बीजाची वाढ करावयाची असेल तर स्त्रियांना मतदानाचा हक्क मोठ्या प्रमाणांत मिळेल अशी व्यवस्था केली पाहिजे."

पुढं 'लोथिअन' कमिटी बसली, तिनंहि हें तत्त्व पूर्ण मान्य केलं, आणखी शुभ्र पत्रकांतल्या प्रत्यक्ष शिफारशी जरी भिन्न होत्या तरी या तत्त्वाचा त्यांत पुरस्कार केला होता. आतां नव्या हिंदी राज्यघटनेला कायद्याचं पक्कं स्वरूप आलं आहे. या कायद्याअन्वयं प्रांतिक कायदेमंडळांत एकंदर ४१ जागा स्त्रियांच्या वांट्याला येतील अन् एकंदर अदमासें ६० लक्ष स्त्रियांना मतदानाचा हक्क मिळेल. म्हणजे पूर्वी २० पुरुष-मतदारांमागं एक स्त्री-

मतदार असं प्रमाण होतं, तें आतां साडेचार पुरुषांमागं एक स्त्री असं पडेल.

या आंकड्यांकडेच नुसतं पाहिलं तर स्त्रियांची दाद बरीचशी लागली असं वाटतं. पण सूक्ष्म दृष्टीनं पाहिलं तर वस्तुस्थिति तशी नाहीं असं म्हणावं लागेल. किंबहुना स्त्रियांच्या हक्कांच्या उत्कर्षाच्या अन् प्रतिष्ठेच्या दृष्टीनं नव्या राज्यघटनेपेक्षां जुनीच बरी होती असं विधान करायची पाळी येईल. या विधानाची फोड करून सांगण्याचं हें स्थळ नाहीं. म्हणून मी इतकंच म्हणतें, कीं स्त्रियांच्या दृष्टीनं नवी राज्यघटना जुन्यापेक्षां बरी असं जरी गृहीत धरलं तरी तिच्यावर हिंदी स्त्रियांनीं कायमचा संतोष मानावा अशी तरी ती खास नाहीं. मिळाल्या याहूनहि अधिक जागा कायदे मंडळांत मिळविण्यासाठीं व मतदानाचा हक्क अधिक प्रमाणांत प्राप्त करून घेण्यासाठीं हिंदी स्त्रियांनीं सतत प्रयत्न चालू ठेवले पाहिजेत. प्रत्यक्ष राज्यकारभारांत भागीदारी आपण जितकी अधिक मिळवूं तितके आपले जिव्हाळ्याचे प्रश्न सोडविण्याचं स्वातंत्र्य अन् सामर्थ्य आपल्या अंगीं अधिक येईल ही गोष्ट हिंदी स्त्रियांनीं सदैव लक्षांत ठेवली पाहिजे. क्षणभर प्रत्यक्ष सत्तेला जें महत्त्व आहे तें ढीगभर मुक्या लोकमताला नाहीं. लोकमताच्या नुसत्या दर्जाला किंवा विस्ताराला कुठलंहि सरकार वचकत नाहीं. हिंदुस्थानांतलं परकी सरकार तर कधींच वचकणार नाहीं. सरकार बेपर्वाई दाखवूं लागलं तर सरकारला त्रास देण्याचं सामर्थ्य त्या लोकमतांत किती आहे यावरच साऱ्या गोष्टी अवलंबून असतात. सरकारला सतावून सोडण्याचे सनदशीर व बेकायदा असे दोन्ही प्रकारचे अनेक मार्ग आहेत. महायुद्धापूर्वीं इंग्लंडमधील स्त्रियांनीं जे अडवणुकीचे मार्ग अवलंबिले किंवा हिंदुस्थानांत कॉंग्रेसनं जे सत्याग्रहाचे मार्ग योजले त्या मार्गांनीं जाण्याची पाळी हिंदी स्त्रियांवर येऊं नये असं वाटत असेल तर त्यांना हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत मिळाला आहे त्यापेक्षां कितीतरी मोठा भाग मिळाला पाहिजे.

या बाबतींत इंग्लंडमधला दाखला लक्षांत ठेवण्यासारखा आहे. विधवांचीं पेन्शनं, बाळंतिणींचे भत्ते, नवऱ्याकडून छळल्या जाणाऱ्या बायकांची पोटगी, इत्यादि सुधारणा इंग्लंडमध्यें झाल्या त्या काय कामकरी पुरुषांच्या चळवळीनं ? अशी कोणाची समजूत असेल तर ती निखालस चुकीची आहे. या सुधारणांसाठीं समाजाच्या सर्व वर्गांतल्या स्त्रियांनीं एक होऊन नेटानं चळवळ केली म्हणून त्या घडून आल्या; आणि ब्रिटिश स्त्रियांनीं मतदानाचा विस्तृत हक्क मिळविल्यापासून असल्या सुधारणांना केवढी तरी चालना मिळाली आहे ! नव्या हिंदी राज्यघटनेबाबत ' जॉइंट सिलेक्ट कमिटी'पुढं झालेल्या साक्षीपुराव्यांतहि असं सांगण्यांत आलं, कीं १९०० पासून १९१८ पर्यंतच्या कालावधींत बायकांच्या हितसंबंधाचे अवघे चारच कायदे इंग्लंडमध्यें पास झाले, पण बायकांना मतदानाचे योग्य हक्क मिळाल्यानंतरच्या पहिल्या नऊ वर्षांत असले वीस कायदे पास झाले !

यावरून आपला मतदानाचा हक्क आणखी वाढवून घेण्यासाठीं, अन् कायदेमंडळांत अधिक जागा मिळविण्यासाठीं हिंदी स्त्रियांनीं आपल्या प्रयत्नांची शिकस्त कां केली पाहिजे, तें उघड होईल.

मात्र एकीकडे बालविवाहाची रूढि नष्ट करण्यासाठीं आपल्या हातीं राजकीय सत्तेचा अंश अधिकाधिक यावा म्हणून झटत असतांना, हिंदु स्त्रियांनीं दुसरंहि एक कार्य अव्याहत चालूं ठेवलं पाहिजे. तें कार्य म्हणजे अनुकूल लोकमत बनविण्याचं. सामान्य जनता अजूनहि या प्रश्नाबद्दल धर्म अन् भोळ्या समजुतींचीं पांघरुणं डोक्यावरून ओढून घेऊन निद्रावश झालेली आहे. तिला जागृत केलं पाहिजे आणि सुशिक्षित समाजाला बालविवाहाचे दुष्परिणाम कळत असले तरी त्यांच्या मताची योग्य संघटना अजून झालेली नाहीं, ती केली पाहिजे.

खरी प्रगति घडवून न आणतां प्रगतिप्रियतेचं प्रशस्तिपत्र मिळविण्याची एक लबाडीची युक्ति म्हणून हिंदु जहालांनीं सारडा

सं. १७ नं. ८८८



कायद्याचा डाव केला असं मिस् मेयोनं आपल्या नव्या पुस्तकांत लिहिलं आहे. या विपर्यस्त विधानांत कांहींएक अर्थ नाहीं. कायदा पास करतांना त्याच्या कलमांत दुबळेपणा व अव्यवहार्यता राहिली त्याबद्दलच्या अपराधांत हिंदुस्थानसरकारचा जो भाग आहे तो नाहीं म्हणून कधींच ठरवितां येणार नाहीं. सारडा कायदा निर्दोष स्वरूपांत पास झाला नाहीं, व पुढं तर त्याची जोपासना मुळींच झाली नाहीं, याचं खरं कारण माझ्या मतानं असं आहे, कीं ज्यांनीं त्याला जन्म दिला त्यांच्या उचंबळलेल्या भावना तशाच दीर्घ काल टिकल्या नाहींत. उन्हाळ्यांतल्या वादळाच्या वेळीं गडगडाट व्हावा, पण एक सर पडली कीं आभाळ स्वच्छ व्हावं तसं त्यांच्या भावनांच्या गडगडाटाचं झालं. कायदा पास होत असतांना राणा भीमदेवी भाषणं झालीं, पण पुढं आपापले ठरीव आवडते धंदे करायला सरकार आणखी कायदेमंडळं मोकळीं राहिलीं. आतां तर ज्यांनीं तो कायदा पास करून घेतला त्यांना सुद्धां त्याची आठवण कुणीं करून दिली तर नकोशी वाटते, अन् स्वतःचं समर्थन करण्यासाठीं ते येवढंच पुटपुटतात, कीं ' आम्ही तरी काय करावं ? लोकमतच परिपक्व नाहीं ! ' पण लोकमत परिपक्व नसलं तर तें तयार करायसाठीं ते काय करताहेत ? किंवा कोण काय करीत आहे ?–

सरकार तर कांहीं करायला तयार नाहीं. सरकारी अधिकारी मुळीं स्पष्ट बोलून दाखवितात, कीं बालविवाहाच्या बाबतींत लोकमत तयार करण्याचं काम आमचं नाहीं, लोकांचं आहे ! इतकंच नव्हे, बालविवाहाच्या नाजूक प्रश्नाची चर्चासुद्धां शक्यतों दाबून टाकण्याचा सरकारचा संकेत असल्यासारखा दिसतो. १९३२ सालीं हिंदुस्थानांत हिंडतां हिंडतां जेव्हां मी कलकत्त्यास गेलें, तेव्हां रेडिओवर बायकांसाठीं राखून ठेवलेल्या वेळांत मतदानाच्या प्रश्नावर मीं बोलावं असं मला आमंत्रण करण्यांत आलं. मला असं सांगण्यांत आलं, कीं खास स्त्रियांसाठीं ठेवलेलीं हीं भाषणं त्यांना फार आवडतात, अन् शिक्षणाचं व मतप्रचाराचं तें एक

या बाबतींत इंग्लंडमधला दाखला लक्षांत ठेवण्यासारखा आहे. विधवांचीं पेन्शनं, बाळंतिणींचे भत्ते, नवऱ्याकडून छळल्या जाणाऱ्या बायकांची पोटगी, इत्यादि सुधारणा इंग्लंडमध्यें झाल्या त्या काय कामकरी पुरुषांच्या चळवळीनं ? अशी कोणाची समजूत असेल तर ती निखालस चुकीची आहे. या सुधारणांसाठीं समाजाच्या सर्व वर्गांतल्या स्त्रियांनीं एक होऊन नेटानं चळवळ केली म्हणून त्या घडून आल्या; आणि ब्रिटिश स्त्रियांनीं मतदानाचा विस्तृत हक्क मिळविल्यापासून असल्या सुधारणांना केवढी तरी चालना मिळाली आहे ! नव्या हिंदी राज्यघटनेबाबत ' जॉइंट सिलेक्ट कमिटी'पुढं झालेल्या साक्षीपुराव्यांतहि असं सांगण्यांत आलं, कीं १९०० पासून १९१८ पर्यंतच्या कालावधींत बायकांच्या हितसंबंधाचे अवघे चारच कायदे इंग्लंडमध्यें पास झाले, पण बायकांना मतदानाचे योग्य हक्क मिळाल्यानंतरच्या पहिल्या नऊ वर्षांत असले वीस कायदे पास झाले !

यावरून आपला मतदानाचा हक्क आणखी वाढवून घेण्यासाठीं, अन् कायदेमंडळांत अधिक जागा मिळविण्यासाठीं हिंदी स्त्रियांनीं आपल्या प्रयत्नांची शिकस्त कां केली पाहिजे, तें उघड होईल.

मात्र एकीकडे बालविवाहाची रूढि नष्ट करण्यासाठीं आपल्या हातीं राजकीय सत्तेचा अंश अधिकाधिक यावा म्हणून झटत असतांना, हिंदु स्त्रियांनीं दुसरंहि एक कार्य अव्याहत चालू ठेवलं पाहिजे. तें कार्य म्हणजे अनुकूल लोकमत बनविण्याचं. सामान्य जनता अजूनहि या प्रश्नाबद्दल धर्म अन् भोळ्या समजुतींचीं पांघरुणं डोक्यावरून ओढून घेऊन निद्रावश झालेली आहे. तिला जागृत केलं पाहिजे आणि सुशिक्षित समाजाला बालविवाहाचे दुष्परिणाम कळत असले तरी त्यांच्या मताची योग्य संघटना अजून झालेली नाहीं, ती केली पाहिजे.

खरी प्रगति घडवून न आणतां प्रगतिप्रियतेचं प्रशस्तिपत्र मिळविण्याची एक लबाडीची युक्ति म्हणून हिंदु जहालांनीं सारडा

सं. नि. नं. ८५६

कायद्याचा डाव केला असं मिस् मेयोनं आपल्या नव्या पुस्तकांत लिहिलं आहे. या विपर्यस्त विधानांत कांहींएक अर्थ नाहीं. कायदा पास करतांना त्याच्या कलमांत दुबळेपणा व अव्यवहार्यता राहिली त्याबद्दलच्या अपराधांत हिंदुस्थानसरकारचा जो भाग आहे तो नाहीं म्हणून कधींच ठरवितां येणार नाहीं. सारडा कायदा निर्दोष स्वरूपांत पास झाला नाहीं, व पुढं तर त्याची जोपासना मुळींच झाली नाहीं, याचं खरं कारण माझ्या मतानं असं आहे, कीं ज्यांनीं त्याला जन्म दिला त्यांच्या उचंबळलेल्या भावना तशाच दीर्घ काल टिकल्या नाहींत. उन्हाळ्यांतल्या वादळाच्या वेळीं गडगडाट व्हावा, पण एक सर पडली कीं आभाळ स्वच्छ व्हावं तसं त्यांच्या भावनांच्या गडगडाटाचं झालं. कायदा पास होत असतांना राणा भीमदेवी भाषणं झालीं, पण पुढं आपापले ठरीव आवडते धंदे करायला सरकार आणखी कायदेमंडळं मोकळीं राहिलीं. आतां तर ज्यांनीं तो कायदा पास करून घेतला त्यांना सुद्धां त्याची आठवण कुणीं करून दिली तर नकोशी वाटते, अन् स्वतःचं समर्थन करण्यासाठीं ते येवढंच पुटपुटतात, कीं ' आम्ही तरी काय करावं ? लोकमतच परिपक्व नाहीं ! ' पण लोकमत परिपक्व नसलं तर तें तयार करायसाठीं ते काय करताहेत ? किंवा कोण काय करीत आहे ?—

सरकार तर कांहीं करायला तयार नाहीं. सरकारी अधिकारी मुळीं स्पष्ट बोलून दाखवितात, कीं बालविवाहाच्या बाबतींत लोकमत तयार करण्याचं काम आमचं नाहीं, लोकांचं आहे ! इतकंच नव्हे, बालविवाहाच्या नाजूक प्रश्नाची चर्चासुद्धां शक्यतों दाबून टाकण्याचा सरकारचा संकेत असल्यासारखा दिसतो. १९३२ सालीं हिंदुस्थानांत हिंडतां हिंडतां जेव्हां मी कलकत्त्यास गेलें, तेव्हां रेडिओवर बायकांसाठीं राखून ठेवलेल्या वेळांत मतदानाच्या प्रश्नावर मीं बोलावं असं मला आमंत्रण करण्यांत आलं. मला असं सांगण्यांत आलं, कीं खास स्त्रियांसाठीं ठेवलेलीं हीं भाषणं त्यांना फार आवडतात, अन् शिक्षणाचं व मतप्रचाराचं तें एक

मोठं साधन होऊन बसलं आहे. मात्र मतभेदाचे विषय टाळण्याची मला सूचना देण्यांत आली, अन् अशा विषयाचं उदाहरण म्हणून सारडा कायद्याचा निर्देश करण्यांत आला ! आहे कीं नाहीं चमत्कार ! सारडा कायदा सरकारच्या पूर्ण संमतीनं झालेला. तो सरकारच्या दप्तरीं दाखल आहे. कलकत्त्याचं रेडिओ स्टेशन सरकारच्या मदतीनंच चाललेलं. ज्या बिचाऱ्या पडदानशीन बायकांना एरव्हीं बाहेरच्या जगाचा कानोसाहि घेतां यायचा नाहीं, त्यांच्याशीं रेडिओवरून सारडा कायद्याबद्दल बोलायला मिळायचं म्हणजे त्यांच्या अत्यंत जिव्हाळ्याच्या एका प्रश्नाविषयीं त्यांना जागृत करायची केवढी अमोलिक संधि. पण सरकारी स्थानावर सरकारी कायद्याविषयीं माहिती देण्याची परवानगी नाहीं ! कारण काय ? तर म्हणे सारडा कायद्याबद्दल अजून लोकमत तयार नाहीं ! पण मी पुन्हा विचारतें, कीं लोकमत तयार नाहीं तर तें तयार करायसाठीं काय खटपट चालली आहे ?

सारडा कायद्याविरुद्ध होणारं लग्न क्वचित् एखाद्या ठिकाणीं एखाद्या सार्वजनिक संस्थेच्या खटपटीनं रहित होत असेल तेवढंच. बायकांच्या परिषदांतून बालविवाहनिषेधपर ठराव होत आहेत. एखाद दुसऱ्या शहरीं स्त्रियांनीं सारडा कमिटी स्थापन करून सारडा कायद्याचा भंग करणाऱ्यावर खटले भरण्याचा उद्योग थोडाफार चालविला आहे. पण दुःखभोगाचा महासागर हटवायला या टिटवीच्या चोंची कशा पुऱ्या पडायच्या ! १९२१ सालापेक्षां १९३१ सालीं साठ लक्ष अधिक बालविवाह घडून आले हें विसरून कसं चालेल ?

सध्यां जे प्रयत्न चालले आहेत त्यांच्या मागची शक्ति बाबागाडी ढकलणाऱ्या नाजूक हाताच्या शक्तीसारखी दुबळी आहे. तिच्याऐवजीं विद्युत्संचय निर्माण करणाऱ्या प्रचंड कारखान्याची शक्ति अस्तित्वांत आली पाहिजे, अन् हरप्रकारचे उपाय व प्रयत्न शोधून काढले पाहिजेत. स्त्रियांच्या हातून हें कार्य होणार नाहीं असं

निराशेनं म्हणायचं कारण नाहीं. काँग्रेसनं सत्याग्रहाची चळवळ केली त्या वेळीं हिंदी स्त्रियांनीं केवढ्या तत्परतेनं आणखी धैर्यानं त्या चळवळीला हातभार लावला त्याची आठवण इतक्यांत शिळी थोडीच झाली आहे ? नवे नवे उपाय योजून पद्धतशीर रीतीनं बालविवाहाच्या दुष्ट रूढीवर हल्ला करायचं हिंदी स्त्रियांनीं ठरवलं तर त्यांना यश मिळाल्यावांचून राहणार नाहीं.

पद्धतशीर कार्याची माझी कल्पना काय आहे ती सांगतें.

'अखिल भारतीय बालविवाहविनाशक समिति' या किंवा या अर्थाच्या दुसऱ्या नांवाची एक मध्यवर्ति संस्था स्थापण्यांत यावी. प्रत्येक प्रांताच्या राजधानीच्या शहरांत या संस्थेची शाखा असावी, व ज्या ज्या ठिकाणीं योग्य माणसं मिळतील तिथं तिथं संस्थेचे प्रतिनिधि आणखी बातमीदार असावेत. समितीनं तीन उद्देश आपल्या पुढं ठेवावेत. बालविवाहाच्या दुष्परिणामांबद्दल लोकांना माहिती देऊन जागृति करणं; सारडा कायद्याची अंमलबजावणी व्हावी यासाठीं शक्य त्या रीतीनं झटणं; आणखी योग्य संधि येतांच सारडा कायद्यांत दुरुस्ती करून घेणं. काम करण्यापेक्षां शंकाच जास्ती काढणारीं, आणखी लोकांच्या दूषणाला भिणारीं माणसं केवळ त्यांच्या मोठेपणाची मध्यवर्ति अगर प्रांतिक कमिट्यांवर घेण्याची चूक त्यांच्या समितीनं करूं नये. लौकिकाचीं, जबाबदार, पण मुख्य म्हणजे कळकळीचीं माणसं कमिट्यांवर असावींत. तीं शक्य तों हिंदी असावींत, पण परदेशीय व्यक्तीला मज्जाव नसावा.

लोकजागृतीचं कार्य करण्यासाठीं हिंदुस्थानांतील सगळ्या प्रांतिक भाषांतून पत्रकं काढून तीं वांटावीं, अन् निरक्षर लोकांपुढं तीं वाचलीं जाण्याची व्यवस्था करावी. सुबोध, सुटसुटीत फिल्म्स तयार कराव्या आणखी त्या खेड्यापाड्यांत सुद्धां चव्हाट्यावर रात्रीं दाखविल्या जाव्या. या मतप्रचाराच्या कामांत स्थानिक सरकारचं सहाय्य मिळेल तेवढं घ्यावं. ठिकठिकाणीं ज्या मिशनरी संस्था आहेत त्यांचंहि सहकार्य मिळविण्यासारखं असलं तर तें मिळवावं.

मतप्रचाराच्या या कार्याच्या जोडीला समितीनं दुसरं कार्य करायचं तें सारडा कायद्याचा अंमल घडवून आणण्याचं. हा अंमल कोणत्या अडचणीमुळं कठीण झाला आहे तें आतांपर्यंतच्या अनुभवानं उघड झालं आहे. तेव्हां त्या अडचणी दूर करायचं काम समितीनं अंगावर घेतलं पाहिजे. यासाठीं समितीनं जाहीर करावं, कीं सारडा कायद्याविरुद्ध झालेल्या अगर होणार असलेल्या विवाहाची बातमी समितीच्या स्थानिक कमिटीकडे कुणालाहि खाजगी रीतीनं, इतकंच नव्हे, तर निनांवी पत्रानं सुद्धां धाडतां येईल. अशी बातमी मिळाली कीं, कमिटीनं तिच्या सत्यासत्यतेबद्दल पूर्ण चौकशी करावी, अन् खरोखरच गुन्हा सिद्ध करण्यासारखी माहिती मिळाली तर जरूर ती जामिनकीची रक्कम भरून कमिटीनं कोर्टांत खटला दाखल करावा. जिथं विवाह होऊन गेला नसेल, व्हायचा असेल, तिथं तो करणाऱ्या मंडळीस कमिटीनं आधीं इशारा द्यावा, व त्याचा उपयोग झाला नाहीं तर डिस्ट्रिक्ट जज्जाकडून 'इंजक्शन' मागावं. कमिटीनं भरलेल्या खटल्यांत आरोपींना शिक्षा झाल्या तर त्यांजकडून विवाहबद्ध मुलीला पुढं उपसर्ग पोंचणार नाहीं, अशी कमिटीनं काळजी घ्यावी. असल्या वर्तनाबद्दलहि कमिटी पुन्हा आपल्यावर खटला भरील अशी त्यांस दहशत वाटली म्हणजे काम भागेल. या सर्व गोष्टींसाठीं कमिटीनं डॉक्टरांची एक, वकिलांची एक, अशा सल्लागार पोटकमिट्या नेमलेल्या असाव्यात, अन् पडेल तें काम कळकळीनं आणखी हौसेनं करणाऱ्या स्वयंसेविका तयार कराव्या.

जेव्हां जेव्हां एखादी मोठी सुधारणा घडवून आणायची असेल तेव्हां तेव्हां वर सुचविलेल्या रूपरेषेला अनुसरून चळवळीचं यंत्र चालू करायची इकडे इंग्लंडमध्यें आम्हांला आतां संवय झाली आहे. युद्धापूर्वीं आम्ही स्त्रियांच्या मतदानाच्या हक्कासाठीं झगडलों तेव्हां, मद्यपानबंदीच्या चळवळीच्या वेळीं, आणि जागतिक शांततेच्या सध्यांच्या चळवळींतहि वर सुचविलेल्या दिशांनींच कार्य करण्यांत आलं. हें कार्य मोठ्या प्रमाणांत होत राहिलं कीं तें करणाऱ्या

व्यक्तींच्या हालचाली म्हणजे वृत्तपत्रांना एक मोठी बातमी वाटूं लागते, अन् साऱ्या लोकांचं लक्ष त्या व्यक्तींच्या मताकडे आणखी खटपटीकडे वेधलं जातं. असं झालं म्हणजे उद्दिष्ट कार्यांतले अडथळे हलके हलके दूर होतात व सरकारला सुद्धां सहाय्य करणं भाग पडतं. बालविवाहाचा प्रश्न तर असा आहे, कीं त्याच्या दुष्परिणामांचीं नुसतीं सत्य शब्दचित्रं लोकांपुढं मांडलीं तरी लोकजागृतीचं कार्य सहजासहजीं होईल.

मात्र हें सारं खरं असलं तरी मन अशा शंकेनं व्याकुळ होतं, कीं या साऱ्या गोष्टी हिंदुस्थानांत घडतील का ? कारण हिंदुस्थानच्या लोकांची अशी स्थिति आहे–सगळ्याच देशांतल्या लोकांची थोड्या-फार अंशानं असते–कीं एखादी गोष्ट केवळ त्यांच्या बुद्धीला पटवून दिल्यानं भागत नाहीं; वस्तुस्थिति आणखी आंकडे त्यांच्यापुढं मांडल्यानं भागत नाहीं; जोशी कमिटीपुढं जे असंख्य भयंकर प्रकार उघड झाले ते त्यांच्या निदर्शनास आणले तरी भागत नाहीं. रोज मरे त्याला कोण रडे या न्यायानं त्या अंगावर शहारे आणणाऱ्या हकी-गतीहि त्यांच्या दृष्टीला दिसेनाशा झाल्या असतील त्यांना जागृत अन् कार्योन्मुख करायचं असेल तर ज्वालामुखीसारखा एखादा स्फोटच झाला पाहिजे !

असा ज्वालामुखी हिंदुस्थानांत कुठं आहे ?

कदाचित् या घटकेला सुद्धां तो एखाद्या अवतारी हिंदी स्त्रीच्या हृदयांत सुप्तावस्थेंत असेलहि ! बालविवाहाच्या भयंकर परिणामांचा विचार करून समाजसुधारणेच्या तळमळीची जी ज्योत स्वतःच्या अंतःकरणांत प्रदीप्त झाली, तिच्यावर हजारों स्त्रियांच्या व पुरुषांच्या अंतःकरणांतल्या ज्योती पेटवून बालविवाहाची रूढि कायमची नष्ट करायसाठीं केवळ फुरसतीचा एखादा घटका नव्हे तर अहोरात्र–कदाचित् जन्मभरहि झुंज करावी लागली तर करायला उद्युक्त करणारी हिंदी स्त्री कदाचित् लवकरच अवतीर्ण होणार असेल. समाजाच्या नसानसांत भिनलेल्या दुष्ट रूढि नष्ट करायचं प्रचंड कार्य अशा व्यक्तीवांचून होत नाहीं.

डोंगर उलथून टाकायला छोटे चमचे कसे पुरे पडणार ? पडतीलहि. पण लाखों चमचे खणायचं काम करूं लागले अन् वारुळांतल्या मुंग्यांची चिकाटी ते चमचे धरणाऱ्या हातांत आली तर ! स्त्रियांनीं मौन सोडलं पाहिजे, आळस झाडला पाहिजे, भीति टाकली पाहिजे. आपलं कल्याण दुसरं कोणी करील ही वेडी आशा पुष्कळ झाली. त्वेषानं उठायची वेळ आतां आली आहे ! 'यंग इंडिया'च्या एका अंकांत गांधीजींनीं लिहिलं होतं,

"पुरुषांच्यावर दोष टाकून स्त्रियांनीं आपली विवेकबुद्धि गप्प करावी यांत कोणता मोठेपणा ?...बालविधवांचा दुःख-भार हलका करणाऱ्या, आणखी बालविवाहाची भयंकर चाल नष्ट होईपर्यंत विश्रांति घेणार नाहीं व पुरुषांनाहि घेऊं देणार नाहीं अशी प्रतिज्ञा करून पुढें सरसावणाऱ्या वीरांगना आमच्या देशांत नाहींतच का ? "

बंडाच्या वेळीं झांशीच्या राणीनं अलौकिक शौर्य गाजवलं. मागच्याच पिढींत पंडिता रमाबाईनं लोकसेवेंत आपलं आयुष्य वेंचून हिंदी स्त्रीच्या निष्ठेची साक्ष जगाला पटवून दिली. अगदीं परवां सत्याग्रहाच्या वेळीं तर हजारों स्त्रियांनीं लाजेचीं, भयाचीं व रूढीचीं सारीं बंधनं तोडून चळवळींत उडी घेतली, सभा भरविल्या, कायदेभंगाचीं कृत्यं केलीं, विलायती कापडावर आणखी दारूच्या दुकानांवर पिकेटिंग केलं, अपमान, हाल व कारागृहवासहि सोसला !

समाजांतली सुप्त कार्यशक्ति एका कार्याच्या निमित्तानं जागृत झाली कीं दुसरं कार्य साधायलाहि तिचा उपयोग करून घेतां येतो. हा सामान्य नियम खरा असेल तर सत्याग्रहासारख्या राजकीय चळवळींत घडलेली हिंदी स्त्रियांच्या ठिकाणची जागृति बालविवाह नष्ट करायला उपयोगीं पडेल असं मानायला प्रत्यवाय नाहीं. मात्र यापुढं स्त्रियांनीं चळवळ करायची ती कांहीं वेळापूर्वीं सुचविल्याप्रमाणं प्रचंड प्रमाणावर केली पाहिजे. नुसत्या दोनचार परिषदा भरवून अन् दोन ठराविक सांच्याचे ठराव पास केल्यानं भागायचं नाहीं !

सं. १७

शहरोशहरीं अन् खेड्यापाड्यांत अफाट प्रमाणावर मिरवणुकी काढाव्या, शेंकडों हजारों सुशिक्षित स्त्रियांनीं पंढरीच्या वारीवर यात्रेकरूंचा प्रचंड मेळा निघतो तसा मेळा काढून खेडोपाडीं जावं, व्याख्यानं द्यावीं, गाणीं म्हणावीं, छोटीं नाटकं करून दाखवावीं, चित्रपट दाखवावे. एखाद्या स्त्रीनं विमानांतून हिंडावं अन् लक्षावधि हस्तपत्रकं खालीं टाकावीं. अशा उपक्रमांनीं खेड्यापाड्यांतले लोक देखील जागे होतील; कारण ते लोक निरक्षर असले तरी त्यांना अक्कल आहे, भूतदयेसारख्या भावना आहेत, अन् उपदेश करणाऱ्याची कळकळ ओळखण्याची पात्रता त्यांच्या अंगीं आहे ! आजपर्यंत हे लोक भटाभिक्षुकांच्या अन् सावकारांच्या कारस्थानांना बळी पडत आले याचं कारण बहुतांशीं येवढंच कीं, त्यांचे आचारविचार आणखी त्यामागची वेडी विचारसरणी सुधारण्याचा कोणींच प्रयत्न केला नाहीं. राज्यकर्त्यांनींहि केला नाहीं, किंवा त्यांच्या सुशिक्षित बंधुभगिनींनींहि केला नाहीं ! यापुढं हिंदी स्त्रियांनीं तो केला तर तो विफल होईल असं मला वाटत नाहीं.

लोकांना जागृत करायचं त्याप्रमाणंच सरकारला आपली बेफिकिरी सोडायला लावायचं कामहि स्त्रियांनीं नेटानं करायला पाहिजे. सरकार दाद देईनासं झालं तर लोकांच्या कल्याणासाठीं शांततामय निरोधन आणखी बहिष्कार हे मार्गसुद्धां स्त्रियांनीं बेशक अवलंबावे. उदाहरणार्थ, जिथं बालविवाह होणार असेल तिथं तो होऊं नये म्हणून धरणं धरावं. बायकांच्या सर्व संस्थांत असा नियम असावा, कीं जी बाई बालविवाहाला हजर राहील, तिचं नांव संस्थेंतून कमी केलं जाईल. सारडा कायद्याविरुद्ध वागणाऱ्या नोकरांना नोकरीला ठेवायचं नाहीं, दुकानदाराकडून माल घ्यायचा नाहीं, अन् अशा लोकांशीं दळणवळण ठेवायचं नाहीं, अशा प्रतिज्ञेचं कलमच स्त्रियांच्या क्लबांच्या व संस्थांच्या प्रवेशपत्रिकेंत असावं. म्युनिसिपालिटीच्या किंवा कायदेमंडळाच्या निवडणुकीला उभे रहाणाऱ्या प्रत्येक इसमानं आपल्या जाहीरनाम्यांत

सारडा कायद्याचा अंमल व्हावा एतदर्थ मी झटेन असं आश्वासन दिलं पाहिजे असा हट्ट धरावा. उमेदवार कुठल्याहि सभेंत बोलूं लागला कीं, 'तुम्ही बालविवाह नष्ट करायसाठीं काय करणार आहांत ?' असा प्रश्न त्याला विचारला जाईल, अन् त्याचं उत्तर त्याला द्यावं लागेल, अशी स्थिति स्त्रियांनीं निर्माण केली पाहिजे !

चळवळीचे हे प्रकार भडक वाटण्यासारखे आहेत. असले भडक प्रकार मला स्वतःला मनापासून आवडतात असंहि नाहीं. आमच्या इंग्लंड देशांत स्त्रियांनीं या प्रकारांचा प्रथम अवलंब केला तेव्हां मी त्याविरुद्ध होतें. पण हळुहळु माझी खात्री होत गेली, कीं हे उपक्रम करण्यांत आले म्हणूनच एरवीं केवळ शांत सरळ मतप्रचाराचा ध्वनि ज्यांच्या कानांत शिरला नसता अशा लक्षावधि लोकांची स्त्रियांच्या मागण्यांच्या वाजवीपणाबद्दल खात्री पटली, आणखी हजारों स्त्रीपुरुष चळवळींत सामीलहि झाले ! शंभर लोकांत फार तर चारपांच व्यक्ति असतात, कीं त्यांच्या तर्कबुद्धीला एखादी गोष्ट पटवून दिली कीं कार्यभाग होतो. बाकीच्या माणसांना जागं करायला नुसतं तर्कशास्त्र पुरं पडत नाहीं, आरडाओरडाच करणं आवश्यक असतं.

कुणी म्हणेल इंग्लंडची गोष्ट निराळी, चळवळीच्या भडक प्रकारांनीं हिंदुस्थानांत चांगल्यापेक्षां वाईटच परिणाम होण्याचा संभव जास्त आहे. पण मी म्हणतें, जिच्यापासून सर्वस्वीं सुपरिणामच होतील अशी प्रचंड समाजसुधारणेची चळवळ असणं शक्य आहे काय ? लोकजागृतीची हुल्लड उठवायची म्हटलं, कीं थोडाफार वाइटाचा संभव गृहीत धरलाच पाहिजे. बालविवाहप्रतिबंधासाठीं स्त्रियांनीं कायदेभंगापर्यंत मजल मारली तरी ती एक भयंकर गोष्ट होईल असं मला वाटत नाहीं. कारण, सारडा कायद्यापुरतंच बोलायचं झालं तर सध्यां काय मोठा कायदा पाळायची उत्सुकता लोकांच्या ठिकाणीं आहे ? सारडा कायदा होणार असं ऐकतांच लाखों लग्नांची गर्दी उसळली, यावरून कायदा झाला तर तो आपल्याला पाळला पाहिजे

अशा हिशेबानं लोक वागले हें उघडच होतं. पण पुढं सनातनी लोकांनीं जरा ऊग्र स्वरूप धरल्याबरोबर सरकारचे हातपाय गळाटलेले पाहून लोकांचा कायद्याबद्दलचा आदर जसा कांहीं वाढलाच असेल ? गंमत अशी, कीं ज्या वेळीं सारडा कायद्याचा भंग होत असलेला सरकार उघडया डोळयांनीं पहात होतं, त्याच वेळीं इतर बाबतींतल्या कायदेभंगाचा सरकार खंबीरपणानं, इतकंच नव्हे तर निष्ठुरपणानं सुद्धां बींमोड करीत होतं ! कारण, त्यांत सरकारी नोकरांच्या अन् व्यापारी सग्यासोयऱ्यांच्या हिताहिताचा प्रश्न होता ना ! या प्रकारावरून लोकांनीं काय बोध घेतला असेल ? हाच कीं नाहीं, कीं कायदा धाब्यावर बसवून आईबापांनीं आपल्या अल्पवयी पोरींना खुशाल वाटेल त्याला देऊन टाकावं, नवऱ्यांनीं आपल्या अल्पवयी पत्नींना ग्भ ́मानेल तसं वागवावं, फक्त हीं कर्मं सरकारच्या अगदींच डोळयांपुढं न करण्याचं नाटक केलं म्हणजे झालं ! ही जर सध्यांची परिस्थिति, तर स्त्रियांनीं तीव्र चळवळ केली तर शांतता अन् सुव्यवस्था विघडण्याचा संभव आहे, असला आक्षेप घेण्यांत काय अर्थ आहे ? वर्षाकाठीं मृत्युमुखीं पडणाऱ्या स्त्रियांची अन् मुलांची संख्या पाहिली, कीं तिला कारण असलेली बाल-विवाहाची रूढि नष्ट करतांना सुव्यवस्थेची आणखी शांततेची परीटघडी थोडी बिनसली तरी चालेल असंसुद्धां म्हणावंसं वाटतं ! सर-कारला आपली जबाबदारी टाळावीशी वाटत आहे तेव्हां स्त्रियांनीं पुढं झालंच पाहिजे, म्हणजे तरी सरकारला थोडी शरम वाटेल !

हिंदी स्त्रियाच कदाचित् मला म्हणतील, कीं बालविवाहाचा नायनाट करण्यासाठीं प्रचंड चळवळ करावयाची ही वेळ नाहीं; आधीं देशाला परकी अमलांतून मुक्त करायसाठीं पुरुष झगडताहेत त्यांना आम्हीं साहाय्य केलं पाहिजे. पण ही विचारसरणी चुकीची आहे. मी असं म्हणतें म्हणून माझ्या हिंदी भगिनींनीं माझ्यावर रागावू नये. मला प्रामाणिकपणानं वाटतं, कीं राजकीय हक्कापेक्षां बालविवाहासारख्या भयंकर रूढींतून समाजाची सुटका करण्याचं

कार्य अधिक महत्त्वाचं आहे. हें कार्य करण्यासाठीं स्त्रियांनीं जंगी चळवळ उठविली तर तिच्यामुळं स्वराज्य अधिक जवळ येईल. आणखी जगांतल्या इतर राष्ट्रांच्या दृष्टीनं हिंदुस्थानची इभ्रत शतपट वाढेल. हिंदुस्थानांतल्या लोकांना कल्पनाहि नसेल इतकीं इकडचीं मोठमोठीं राजकारणी माणसं बालविवाहासारख्या रूढींनीं धसकून जातात, अन् अशा भयंकर चालीरीति ज्या देशांत चालू आहेत त्या देशाच्या हातीं पूर्ण स्वराज्याचीं सूत्रं देणं धोक्याचं आहे असं त्यांना खरोखर मनापासून वाटतं. त्यांचे मुद्दे मला पूर्णपणं पटतात असं नाहीं; किंवा त्यांच्या मुद्याचं खंडण हिंदी पुढारी कसं करतात तें मला माहित नाहीं असंहि नाहीं; महत्त्वाची गोष्ट निराळीच आहे.

ती ही, कीं पापाचं खापर एकमेकांच्या डोक्यावर फोडण्याचा खेळ आतां पुरे नाहीं का झाला ? हा खेळ चालू राहिला कीं बालविवाहरूपी बकासुर लाखों स्त्रियांचे अन् बालकांचे बळी घेतच राहील ! आज प्रतिवर्षीं कमींत कमी दोन लाख अल्पवयी मुली मृत्युमुखीं पडताहेत ! म्हणजे रोजच्यारोज दर तासाला वीस मुलींची प्राणाहुति जात आहे ! या भयंकर प्रकाराकडे कुणीच लक्ष देणार नाहीं काय ? स्त्रियांच्या दुःखभोगाचा प्रश्न असला, कीं पुरुषाला कांहीं ऐकूं येऊं नये, दिसूं नये, वाचा फुटूं नये, असा स्त्रीजातीला शापच आहे कीं काय, असं कधीं कधीं माझ्या मनांत येतं ! नाहीतर पुरुषांची कांहीं सदसद्विवेक बुद्धि अशी स्वस्थ राहिली नसती! रात्रीच्या शांत वेळीं, एकांतांत, तरी जे कोटयवधि जीव आजपर्यंत बालविवाहाच्या कुंडांत दग्ध झाले त्यांचीं पिशाच्चं दृष्टीस पडून ते दचकून जागे झाले असते !

दोन वर्षांपूर्वी हिंदुस्थानांत असतांना कानपूर शहर पाहिलं तेव्हां तिथली ' मेमोरिअल गार्डन ' नांवाची बाग पाहयला मी गेलें होतें. इंग्रज माणसाला हें स्थळ पवित्र वाटतं. बंडाच्या वेळीं नानासाहेबानं बिबीगडांतल्या इंग्रज स्त्रियांची अन् मुलांची कत्तल उडविली आणि त्यांचीं प्रेतं एका विहिरींत फेंकून देवविलीं. या विहिरीवर

आतां स्मारक उभारलेलं आहे. पुनरुत्थापनाच्या देवदूताची मूर्ति तिथं उभी केली आहे अन् तिच्याखालीं नानासाहेबाच्या कत्तलीला बळीं पडलेल्या अभागी जीवांच्या समाधि आहेत. त्या बागेंत मी गेलें तेव्हां दोनचार पहारेकऱ्यांखेरीज तिथं कोणी नव्हतं. पण मला भास झाला कीं, जणूं इतक्या गर्दीचं दुसरं ठिकाण मीं कधीं पाहिलंच नव्हतं ! बंडांत मारल्या गेलेल्या इंग्रज स्त्रियांचे आवाज मला अस्पष्टपणें ऐकूं येऊं लागले ! पण त्या स्त्रियांचा बंदिवास अन् मृत्यु फार सुखाचा म्हणावा लागेल. अशा भयंकर हालअपेष्टांत ज्यांनीं आयुष्य काढलं अन् शेवटीं भेसुर यमराजांच्या गळफांसांत अखेरचा श्वास सोडला, अशा लक्षावधि बालकांच्या अन् स्त्रियांच्या अंधुक कृष्णाकृति त्या बागेंत गर्दी करून वावरतांना मला दिसल्या !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
५८३२

—समाप्त—

REFBK-0005439